# क्षितिज

२०१८-२०१९



बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय

अहमदनगर



८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त मानकन्हैया पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने राजकीय व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अहमदनगर जिल्हा परिषद उपाध्यक्षा मा. सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्यावतीने त्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम.वराट




२६ ऑक्टोबर २०१८ रोजी शेवगाव पंचायत समितीस नाशिक विभागात तृतीय व अ.नगर जिल्ह्यात द्वितीय यशवंत पंचायत राज अभियान गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सभापती, पंचायत समिती शेवगाव मा.डॉ. क्षितिज नरेंद्रजी घुले पाटील यांचा गौरव करताना ग्रामविकास मंत्री ना. पंकजा मुंडे व मान्यवर

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

# क्षितिज २०१८-१९

## वार्षिक नियतकालिक : अंक तिसरा

### • संपादक मंडळ •

- संपादक -

प्राचार्य डॉ. टी.एम. वराट

- कार्यकारी संपादक -

प्रा.डॉ. किसन रंगनाथ पिसाळ

- सह-संपादक -

प्रा. श्रीराम विलास मरकड



### - संपादक मंडळ -

प्रा.पी.ए. फटांगरे

प्रा. एन. एन. झिंज

प्रा. एस.बी. दहातोंडे

प्रा. बी. बी. माताडे

प्रा.के.बी. ताके

श्री. पी.व्ही. दळवी

प्रा. ए.के. आहेर

प्रा. बी.एस. पवळे

प्रा. आर.आर. राजपुरे

# पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर




वार्षिक नियतकालिक २०१८-१९

Online College Code No - C02430
ID No. PU/AN/ACS/111/2009
College Code No. 893
Pun. Code-CAAA017120

**दि प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८**
**फॉर्म नं.४ प्रमाणे आवश्यक माहिती**

प्रकाशन स्थळ :
मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व
शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर
फोन : ०२४१-२७७९४९७
Email : mgpcollege@gmail.com
website : www.mgpcollege.com

प्रकाशन काल : वार्षिक

राष्ट्रीयत्त्व : भारतीय

प्रकाशक व संपादक :
प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

राष्ट्रीयत्त्व : भारतीय

पत्ता : मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व
शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

कार्यकारी संपादक :
प्रा. डॉ. किसन रंगनाथ पिसाळ

राष्ट्रीयत्त्व : भारतीय

पत्ता : मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व
शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

मालकी : मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व
शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर


मुद्रक : लक्ष्मी प्रिंट मिडिया, अ.नगर

मी, प्राचार्य डॉ. टी. एम. वराट जाहिर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट


हा अंक खाजगी वितरणासाठी आहे. त्यातील मते व्यक्तिगत आहेत व ललित लेखन स्वतंत्र आहे.

# श्रध्देय



## लोकनेते स्वर्गीय मारूतरावजी घुले पाटील साहेब

(१९३०-२००२)

संस्थापक, अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने

संस्थापक, चेअरमन : श्री. ज्ञानेश्वर सह.सा.का.लि. ज्ञानेश्वरनगर

संस्थापक, अध्यक्ष : श्री. मारूतराव घुले पाटील शिक्षण संस्था, ज्ञानेश्वरनगर

# आधारस्तंभ व प्रेरणास्थान



## मा. आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील

अध्यक्ष : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने
ता. शेवगाव, जि. अहमदनगर

# कृतिशील नेतृत्त्व



## मा.आमदार श्री. चंद्रशेखरजी घुले पाटील

सचिव : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने
ता. शेवगाव, जि. अहमदनगर

# मार्गदर्शक



## मा.सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील

उपाध्यक्षा - जिल्हा परिषद अहमदनगर

# आशास्थान



## मा.श्री. डॉ. क्षितिजभैय्या नरेंद्रजी घुले पाटील

तज्ज्ञ संचालक - श्री. ज्ञानेश्वर सह. सा. का. लि. भेंडा

सभापती - पंचायत समिती शेवगाव, जि. अ.नगर




## डॉ. टी.एम. वराट

प्राचार्य

मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अ.नगर

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## विश्वस्त मंडळ


| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा. ॲड. सतिश किसनराव पाटील | उपाध्यक्ष |
| ३. | मा. आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सचिव |
| ४. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | खजिनदार |
| ५. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | विश्वस्त |
| ६. | मा.श्री. सुभेदार बाबुराव शेख | विश्वस्त |
| ७. | मा.श्री. शब्बीर छन्नुभाई शेख | विश्वस्त |
| ८. | मा.श्री. मच्छिंद्र बारकू काळे | विश्वस्त |
| ९. | मा.श्री. सुधाकर गबाजी कांबळे | विश्वस्त |

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## महाविद्यालयीन स्थानिक व्यवस्थापन समिती

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.आ. नरेंद्र मारूतराव घुले पाटील | अध्यक्ष |
| २. | मा.आ. चंद्रशेखर मारुतराव घुले पाटील | सदस्य |
| ३. | मा. ॲड. सतिश किसनराव पाटील | सदस्य |
| ४. | मा.श्री. गुलाबराव तात्यासाहेब घुले | सदस्य |
| ५. | मा.श्री. कुंडलिक कडू पवार | सदस्य |
| ६. | मा.श्री. रामनाथ जगन्नाथ राठी | सदस्य |
| ७. | मा.डॉ. तुकाराम माणिकराव वराट | सदस्य सचिव |
| ८. | प्रा. अविनाश कारभारी आहेर | शिक्षक प्रतिनिधी |
| ९. | प्रा. पुरुषोत्तम आप्पासाहेब फटांगरे | शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | श्री. प्रविण विष्णु दळवी | शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी |

# प्राचार्यांचे मनोगत...



प्रिय विद्यार्थी मित्रहो,

आपल्या महाविद्यालयाचा 'क्षितिज' हा तिसरा वार्षिक अंक आपल्या हाती देताना मनस्वी खूप आनंद होत आहे. सहकारमहर्षी लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी समाजाच्या विविध घटकातील मुलामुलींना शिक्षणाची सुविधा प्राप्त व्हावी, त्यांचा बौद्धीक व आर्थिक विकास व्हावा, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी, तसेच शिक्षण हे समाज परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे व्यक्ती, कुटुंब व समाज यांचा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक विकास होतो. या विचाराने प्रेरित होऊन ६ जून १९५९ साली जनता शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना दहिगाव ने ता. शेवगाव जि. अ.नगर या ठिकाणी केली. पुढे याच भूमिकेतून आणि पारंपारिक शिक्षणाचा वसा कायम ठेवून संस्थेने अहमदनगर या ऐतिहासिक शहरात जून २००९ मध्ये मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली.

समाजातील दुर्बल, वंचित, गोरगरीब, कष्टकरी आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबातील मुलामुलींना उच्च शिक्षणाची सोय करून त्यांना स्वावलंबी, सक्षम, सबल करणे हे या महाविद्यालयाचे उद्दिष्टये आणि ध्येय आहे. या उद्दिष्टांना व विचाराला अनुसरून संस्थेचे अध्यक्ष मा.आ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार महाविद्यालय यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ हे संपूर्ण जगात महात्मा गांधी सुवर्ण शताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. त्या निमित्ताने महाविद्यालयात त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून रक्तदान शिबीर घेण्यात आले. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्यातून पर्यावरण विषयाचे दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे अयोजन करण्यात आले. 'पर्यावरणपूरक मानव विकासः समस्या व समाधान ' हा विषय असलेल्या या चर्चासत्राचे उद्‌घाटन डॉ. प्रविण सप्तर्षी यांचे शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के. के. पवार हे होते. या प्रसंगी राज्यभरातील अनेक पर्यावरणप्रेमी या कार्यक्रमास उपस्थित होते. याबरोबरच या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमंस्कार शिबीर, डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला, विज्ञान मंडळ, वाङमय मंडळ उद्‌घाटन, ज्येष्ठ नागरिक शिबीर, माजी विद्यार्थी मेळावा व माजी विद्यार्थी संघाची स्थापना, व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम, व स्पर्धा परीक्षा असे विविध उपक्रम घेण्यात आले.

महाविद्यालयात अध्ययन-अध्यापन ही प्रक्रिया अधिक दर्जेदार व प्रभावीपणे होण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळा, सुसज्ज वर्ग खोल्या, समृध्द ग्रंथालय, प्रशस्त क्रीडांगण आणि उच्च शिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्ग यामुळे शैक्षणिक दर्जा उंचावून विद्यार्थ्यांची जडणघडण होण्यास मदत होत आहे. याबरोबरच शिक्षणपूरक अनेक उपक्रमांचे महाविद्यालयात आयोजन केले जाते. विविध क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी विद्यार्थींना स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. ही गरज लक्षात घेऊन महाविद्यालयाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु केलेले आहे.

शैक्षणिक वर्षामध्ये झालेले महाविद्यालयातील अध्ययन, अध्यापन, संशोधन, विस्तारकार्य, अभ्यासक्रम व अभ्यासपूरक, सांस्कृतिक, साहित्य, कला व क्रीडा या बाबतच्या उपक्रमांचे प्रतिबिंब महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात दिसून येत असते. महाविद्यालयातील विविध विभाग, समित्या, मंडळे यांच्या विविध उपक्रमातून महाविद्यालयास गुणवत्ता प्राप्त होते. त्या सर्वांची नोंद वार्षिक अंकात घेतली जाते. महाविद्यालयातील गुणवंत, यशवंत विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळविलेले यश, प्राध्यापकांनी वाढविलेली गुणवत्ता, त्यांचे संशोधन, लेखन यांचीही नोंद विभाग अहवालाच्या माध्यमातून वार्षिक अंकात ठेवली आहे. विद्यार्थ्यांच्या साहित्यिकदृष्ट्या सुप्त गुणांना, विचारांना, भावनांना व्यक्त करण्यासाठी त्यांचे लेख, कविता, कथा व इतर साहित्य या वार्षिक अंकात प्रकाशित केले आहे. त्याचा आपण उदार अंतःकरणाने आस्वाद घेऊन कौतुक कराल असे वाटते. विद्यार्थ्यांचा गुणात्मक विकास व त्यांच्या ज्ञानाची क्षितिजे अधिक समृध्द, संपन्न व व्यापक करण्यासाठी महाविद्यालय वचनबध्द आहे.

**- डॉ. टी. एम. वराट**
प्राचार्य व संपादक

# संपादकीय...



महाविद्यालयातील युवा विचार मनातून साकारलेला 'क्षितिज' नियतकालिकाचा हा तिसरा अंक आपल्या हाती सुपूर्त करताना मला खूप आनंद होत आहे. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांच्या मौलिक मार्गदर्शनातून हा अंक साकार झाला आहे. आपण मागील अंकाप्रमाणे या अंकाचेही स्वागत कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

मानवी जीवनामध्ये साहित्याचे महत्त्व अनमोल आहे. साहित्य निर्मितीसाठी शब्द व त्यातून व्यक्त होणारा अर्थ अत्यंत महत्त्वाचा आहे म्हणूनच संत ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात शब्दाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. ते लिहितात. ''अकार चरण युगुल । उकार उदर विशाल । मकार महामंडल । मस्तकाकारे ।। हे तिन्ही एकवटले । तेथे शब्दब्रम्ह कवळले । ते मिया गुरुकृपा नमिले । आदिबीज ।। (ओवी क्र. १९ व २०)

विद्यार्थ्यांच्या ठायी असणारे शब्दरुपी धन आपणांस नम्रपणे सुपूर्त करीत आहोत. त्यातील मौल्यवान विचार, भावना आत्मसात करून त्यातून काही अंशी विचार परिवर्तन होऊन मानवी जीवन सुखकर होईल अशी अपेक्षा करतो.

सध्याच्या आधुनिक जगात जीवन जगत असताना विद्यार्थ्यांच्या अवतीभोवती कोणत्या समस्या आहेत. त्यांच्या समाजाबद्दल कोणत्या भावना आहेत. त्या व्यक्त करण्यासाठी क्षितिज वार्षिक अंक हे एक उत्तम असे व्यासपीठ आहे. या अंकात विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील काही प्राध्यापकांनी लेख देऊन विचार व्यक्त केले आहेत. त्यामुळे या अंकाची मौलिकता वाढलेली दिसून येते.

या अंकामध्ये साहित्य विश्वाबरोबरच महाविद्यालयात वर्षभर आयोजित केलेल्या शिक्षणपूरक उपक्रमांचा परिचय करून दिला आहे. त्यामुळे महाविद्यालयातील प्रत्येक घटकाशी आपले स्नेहबंध अधिक दृढ होतील असे वाटते.

क्षितिज या तिसऱ्या वार्षिक अंक निर्मितीसाठी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील व संस्थेचे सन्माननीय सचिव व मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील यांनी सतत प्रेरणा व प्रोत्साहन दिले. तसेच महाविद्यालयास सतत सहकार्य करणाऱ्या अहमदनगर जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ. राजश्रीताई चंद्रशेखर घुले पाटील व शेवगांव पंचायत समिती सभापती सन्माननीय डॉ. क्षितिज नरेंद्र घुले पाटील यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरले. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी स्वर्गीय श्री. के.के.पवार यांचे सतत अनमोल सहकार्य मिळाले. त्यांच्या अचानक जाण्याने महाविद्यालय शोकसागरात बुडाले आहे. या शिवाय जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे विश्वस्त मंडळ, मारुतरावजी घुले पाटील शिक्षण संस्था, भेंडे, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, भेंडे यांचे सतत सहकार्य मिळत असते. त्याचबरोबर महाविद्यालयास वेळोवेळी मदत व मार्गदर्शन करणारे ज्ञानेश्वर सह. साखर कारखाना जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे, व्यवस्थापक श्री. अनिल शेवाळे, जनसंपर्क अधिकारी श्री. कल्याणराव म्हस्के, संस्था समन्वयक डॉ. आर.आर. सासवडे, इंजिनियर श्री. आर.एन. मोटे, महाविद्यालय विकास समिती या सर्वांचे मी संपादक मंडळाच्यावतीने मनःपूर्वक आभार मानतो.

संपादक मंडळाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे योग्य मार्गदर्शन व अनमोल सहकार्यामुळे या अंकाचा दर्जा व लोकप्रियता वाढलेली दिसून येत आहे. तसेच संपादक मंडळातील सदस्य प्रा. एस.व्ही. मरकड, प्रा.पी.ए. फटांगरे, प्रा.एन.एन. झिंज, प्रा.एस.बी. दहातोंडे, प्रा.के.बी. ताके, प्रा.बी.बी. माताडे, प्रा.बी.एस. पवळे, प्रा. एम.एस.गवारे, प्रा.ए.के. आहेर, श्री. पी.व्ही. दळवी यांनी अंक निर्मितीसाठी विशेष सहकार्य केले. या शिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवृद या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभल्यामुळे हा अंक वेळेत पूर्ण होऊ शकला. तसेच अंकासाठी साहित्य लेखन देणारे विद्यार्थी, प्राध्यापक या सर्वांसह ज्ञात अज्ञात अशा ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. त्याचप्रमाणे अंकाची सजावट व मुद्रण करणारे मे. लक्ष्मी प्रिंट मिडिया, अहमदनगर यांच्या ऋणात राहणेच मला अधिक आवडेल.

**– प्रा. डॉ. के.आर. पिसाळ**
कार्यकारी संपादक

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## प्राचार्य, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवकवृंद

प्राचार्य डॉ. टी. एम. वराट

## कला शाखा

- **मराठी विभाग**

१. प्रा. डॉ. के. आर. पिसाळ
२. प्रा.डॉ. आर. ए. नेटके

- **हिंदी विभाग**

१. प्रा. एस. बी. दहातोंडे
२. प्रा. एस. ए. काळे

- **इंग्रजी विभाग**

१. प्रा. पी. ए. फटांगरे
२. प्रा. एस. एन. साबळे

- **इतिहास विभाग**

१. प्रा. एस. व्ही. मरकड
२. प्रा. श्रीमती जी. एस. सोनवणे

- **अर्थशास्त्र विभाग**

१. प्रा. श्रीमती अे.आर. पाऊलबुद्धे
२. प्रा. एन.एन. झिंज

- **भूगोल विभाग**

१. प्रा. श्रीमती व्ही.डी. मोरे

- **राज्यशास्त्र विभाग**

१. प्रा. पी.एन. खरड

## वाणिज्य शाखा

**वाणिज्य विभाग**

१. प्रा. के. बी. ताके
२. प्रा. श्रीमती पी. एस. साबळे
३. प्रा. एम.बी. चोपडे

# विज्ञान शाखा

- रसायनशास्त्र विभाग
  १. प्रा. श्रीमती बी.एस.पवळे
  २. प्रा. एस.पी. औटी
  ३. प्रा. ए. ए. डुचे
  ४. प्रा. ए. आय. शेख

- भौतिकशास्त्र विभाग
  १. प्रा. आर. आर. राजपुरे
  २. प्रा. ए. पी. गोंदके
- वनस्पतीशास्त्र विभाग
  १. प्रा. के. व्ही. साबळे
  २. प्रा. बी. बी. माताडे
- प्राणीशास्त्र विभाग
  १. प्रा. पी.पी. जगताप
  २. प्रा. सी.यू. कुलकर्णी
- गणित विभाग
  १. प्रा. एफ. बी. खान

- संगणकशास्त्र विभाग
  १) प्रा. श्रीमती एम.एस.गवारे २) प्रा. एच.एस. सय्यद
  ३) प्रा. पी. एस. गाडे

- क्रीडा विभाग
  १) प्रा. ए.के. आहेर

- ग्रंथालय विभाग
  १) प्रा. श्रीमती के.व्ही. येवले

## प्रशासकीय सेवकवृंद

| | |
|---|---|
| १. श्री. पी. व्ही. दळवी | मुख्य लिपिक |
| २. श्री. झाडे ए. जी. | लिपिक |
| ३. श्री. एन. बी. शिरसाट | शिपाई |
| ४. श्रीमती एस.आर. वाळके | शिपाई |
| ५. श्रीमती व्ही. एन. उंडे | शिपाई |
| ६. श्री.आर.वाय. ससे | शिपाई |
| ७. श्री. टी.आर. तेलधुणे | सुरक्षारक्षक |


जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव ने संचलित

# मारूतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर

## माजी विद्यार्थी संघ

| अ.क्र. | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. महेंद्र धामणे | अध्यक्ष |
| २ | श्री. सुजित ठोंबरे | उपाध्यक्ष |
| ३ | प्रा. एस. व्ही. मरकड | सचिव |
| ४ | प्रा. बी. एस. पवळे | खजिनदार |
| ५ | श्री. अमोल भवार | सदस्य |
| ६ | वैशाली वाक्चौरे | सदस्य |
| ७ | राकेश वाघ | सदस्य |
| ८ | किशोर धोत्रे | सदस्य |
| ९ | स्वप्नील देठे | सदस्य |







# स्व. कुंडलिक कडु पवार

(जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी)

जन्मः ०१/०६/१९४८ मृत्यू : २५/०५/२०१९

यांचे नुकतेच वार्धक्याने दहिगाव ने येथे निधन झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवृंद व विद्यार्थी यांच्याकडून श्री. के.के.पवार यांना

# भावपूर्ण श्रध्दांजली

या शैक्षणिक वर्षात स्वातंत्र्य सेनानी, सैनिक, थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, साहित्यिक, कलावंत, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, सहकार, शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्ती तसेच आपल्या संस्थेचे हितचिंतक दिवंगत झाले, त्यांना नम्रतापूर्वक अभिवादन करून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करीत आहोत.

# गुणवंत विद्यार्थी

## कला शाखा



सुभाष बाचकर
प्रथम वर्ष, कला (प्रथम)



आरती ताडे
द्वितीय वर्ष कला (प्रथम)



राजश्री खामकर
तृतीय वर्ष, कला (प्रथम)

## वाणिज्य शाखा



पुजा भोर
प्रथम वर्ष, वाणिज्य (प्रथम)



सुरेखा मोरे
द्वितीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)



प्राजक्ता कराळे
तृतीय वर्ष, वाणिज्य (प्रथम)

## विज्ञान शाखा



कोमल भोर
प्रथम वर्ष, विज्ञान (प्रथम)



माधुरी वाकळे
द्वितीय वर्ष, विज्ञान (प्रथम)



वैशाली वाक्‌चौरे
तृतीय वर्ष, विज्ञान (प्रथम)

## संगणक विज्ञान शाखा



शबनम शेख
प्रथम वर्ष,
संगणक विज्ञान (प्रथम)



आकाश शर्मा
द्वितीय वर्ष
संगणक विज्ञान (प्रथम)



निकिता भोर
तृतीय वर्ष,
संगणक विज्ञान (प्रथम)

# गुणवंत यशवंत



डॉ. राजेश नेटके
पीएच्.डी. (मराठी) पदवी प्राप्त



श्री. महेंद्र धामणे
अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ



श्री. सुजित ठोंबरे
उपाध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ



श्री. पवार मनोहर
आंतरमहाविद्यालयीन
बॉक्सिंग स्पर्धेत प्रथम



प्राजक्ता पाटील
रा.से.यो. राष्ट्रीय कॅम्प



नवनाथ नवघरे
रा.से.यो. राज्यस्तरीय कॅम्प



कार्तिकेश डहाळे
वर्कशॉप आय.आय.टी.
खरगपूर, उत्तरप्रदेश



गणेश कळमकर
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक




अश्विनी मंचरे
रा.से.यो. उत्कृष्ट स्वयंसेवक

# मान्यवरांच्या भेटी



महाविद्यालयातील विविध उपक्रम पाहणी संदर्भात प्राचार्य डॉ. बी.जे. अप्पाराव (जिजामाता महाविद्यालय, ज्ञानेश्वरनगर भेंडा) भेट दिली असता सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभागास भेट देऊन पाहणी करताना मा.श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सह.साखर कारखाना, भेंडे) व माहिती देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



राज्यस्तरीय चर्चासत्र प्रसंगी प्रा.डॉ.बी.एस. गायकर, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख, (अ.नगर कॉलेज, अ.नगर) यांचा सत्कार करताना प्राचार्य समवेत डॉ. सतिश कुलकर्णी (पर्यावरण शास्त्र विभाग प्रमुख (न्यू आर्टस कॉलेज, अ.नगर) प्रा.डॉ. कुलकर्णी



एम.आय.डी.सी. अहमदनगर येथील पी.एस.आय.श्री. विनोद चव्हाण यांनी महाविद्यालयास भेट दिली असता वार्षिक अंक 'क्षितिज' भेट देऊन सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या अहमदनगर जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मा. बाळासाहेब जाधव (पत्रकार) यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत प्रा.डॉ. के.आर. पिसाळ व प्रा. एस.व्ही. मरकड



जिजामाता महाविद्यालयाचे उपप्राचार्य व सा.फु.पुणे विद्यापीठ अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा.डॉ. संभाजी काळे यांनी महाविद्यालयास भेट दिली असता सत्कार करताना परीक्षा विभाग प्रमुख प्रा.पी.ए. फटांगरे

# विशेष व्याख्यानमाला



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पोवाडा सादर करताना शिवशाहीर विक्रम अवचिते व मान्यवर



शैक्षणिक वर्ष २०१८-१९ नियमित रा.से.यो.कार्यक्रम उद्‌घाटन समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माजी रा.से.यो. अ.नगर तालुका समन्वयक प्रा.व्ही.ई. शिंदे समवेत प्राचार्य डॉ. टी.एम.वराट



शास्त्र शाखेतील 'संधी व आव्हाने' या विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. व्हि.के. धस समवेत शास्त्र शाखेतील विद्यार्थी व प्राध्यापकवृंद



राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.बी.जे. अप्पाराव (जिजामाता महाविद्यालय, भेंडे) समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व प्रा.पी.पी. जगताप



संगणकशास्त्र विभाग आयोजित 'सी.प्रोग्रॅमिंग ॲण्ड डाटाबेस मॅनेजमेंट सिस्टिम' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. एम.एस. लंगोटे



१५० वी राष्ट्रपिता महात्मा गांधी सुवर्ण शताब्दी जयंती निमित्त विचार व्यक्त करता प्रा. डॉ. मोहनराव देशमुख, प्राचार्य व मान्यवर

# राज्यस्तरीय चर्चासत्र



'पर्यावरणपूरक मानव विकासः समस्या व समाधान' या दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र प्रसंगी उद्‌घाटन करताना प्रमुख पाहुणे व बीजभाषक डॉ. प्रविण सप्तर्षी, उद्‌घाटक प्रशासकीय अधिकारी मा.श्री. के.के. पवार, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, संस्था समन्वयक प्रा.डॉ. आर.आर. सासवडे, डॉ. डिसुझा मॅडम



मार्गदर्शक डॉ. सुनिल नेटके यांचा सत्कार करताना प्राचार्य



बीजभाषक डॉ. प्रविण सप्तर्षी आणि मान्यवर



'जैवविविधता व मानवी जीवन' या विषयी विचार व्यक्त करताना डॉ.बी.ए. पाटील



मार्गदर्शक प्रा.डॉ. सुनिल गायकवाड (एस.पी.कॉलेज, पुणे) प्राचार्य व डॉ. किशोर धनवटे (नेवासा)



अ.नगर महाविद्यालय अ.नगर येथील भूगोल विभागातील विद्यार्थ्यांनी केलेल्या पोस्टर प्रेझेंटेशनची पाहणी करताना प्राचार्य व मान्यवर



मार्गदर्शक डॉ. मदन सुर्यवंशी भूगोल विभाग प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद



मार्गदर्शक डॉ. ज्योतीराम मोरे, अध्यक्ष, भूगोल अभ्यास मंडळ सा.फु.पु.विद्यापीठ, पुणे




राज्यस्तरीय चर्चासत्र प्रसंगी अ.नगर महाविद्यालय, अ.नगर येथील विद्यार्थी, डॉ. माया उंडे व प्रा.शरद बोरुडे एक क्षण




समारोप प्रसंगी उपस्थित पर्यावरण प्रेमींना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट समवेत


# शैक्षणिक सहल




शिवतीर्थ रायगड येथे महाविद्यालयाची शैक्षणिक सहल गेली असता दरबारातील सिंहासन चौथऱ्याजवळ टिपलेला एकक्षण



महाराष्ट्राचा मानबिंदु शिवतीर्थ रायगडावरील ऐतिहासिक स्थळांची माहिती व प्रसंग कथन करताना प्रा.डॉ. के. आर. पिसाळ व महाविद्यालयीन विद्यार्थी





प्राचीन कोकणातील गणपतीपुळे येथे शैक्षणिक सहलीनिमित्त भेट दिली असता महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकवृंद



वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित शैक्षणिक सहलीनिमित्त बारामती येथील नर्सरीस भेट दिली असता एक क्षण



वनस्पतीशास्त्र विभाग आयोजित शैक्षणिक अभ्यास सहली निमित्त माळेगाव ता. बारामती येथील कृषि विज्ञान केंद्रास भेट दिली असता महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकवृंद



शैक्षणिक सहली निमित्त महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे येथे भेट दिली असता महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापकवृंद


# राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबीर पिंपळगाव उज्जैनी उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष मा.श्री. काकासाहेब शिंदे, उद्घाटक श्री. अक्षयदादा कर्डिले, सरपंच चंद्रकला कानिफनाथ वाघ, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व ग्रामस्थ




राष्ट्रीय सेवा उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.श्री. काकासाहेब शिंदे (जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर सह.सा.कारखाना, भेंडे) यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट समवेत मा.श्री. अक्षयदादा कर्डिले, मा.श्री. जगन्नाथ मगर व इतर मान्यवर




विशेष श्रमसंस्कार शिबीर पिंपळगांव उज्जैनी येथे मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. शरद बोरूडे (रा.से.यो.अे.टी.आय. प्रमुख अ.नगर कॉलेज अ.नगर) समवेत प्रा.डॉ. के.आर.पिसाळ व प्रा. साबळे



विशेष श्रमसंस्कार शिबीर पिंपळगांव उज्जैनी येथे श्रमदान करताना महाविद्यालयीन स्वयंसेवक विद्यार्थी



स्वच्छता हिच सेवा, या उपक्रमांतर्गत राघवेंद्र स्वामी मंदिर परिसराची स्वच्छता करताना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थींनी समवेत प्रा.बी.एस. पवळे



विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी किर्तनाद्वारे समाजप्रबोधन करताना रा.से.यो. विद्यार्थी ओंकार शिर्के व स्वयंसेवक विद्यार्थी

# राष्ट्रीय सेवा योजना



राष्ट्रीय सेवा योजना दिनप्रसंगी (२४ सप्टेंबर) मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. बाळासाहेब सागडे (सा.फु.पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य) समवेत प्राचार्य, प्रा.एस.ए. काळे, प्रा. लंगोटे




तीन महविद्यालयांनी एकत्र येऊन आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबीर प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना जनरल मॅनेजर श्री. काकासाहेब शिंदे




राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित 'स्वच्छता हिच सेवा' या उपक्रमांतर्गत राघवेंद्र स्वामी मंदिराची स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.एस.ए.काळे, प्राध्यापकवृंद व स्वयंसेवक विद्यार्थी



महाविद्यालय प्रांगणात राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक विद्यार्थी वृक्षारोपणासाठी खड्डे खोदताना एक क्षण


# रांगोळी अविष्कार














# दिन विशेष कार्यक्रम




भूगोल दिनानिमित्त प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. माया उंडे (भूगोल विभाग प्रमुख अ.नगर कॉलेज, अ.नगर) समवेत प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व प्रा.व्ही.डी.मोरे



रा.से.यो., विद्यार्थी विकास मंडळ व राज्यशास्त्र विभाग आयोजित लोकशाही पंधरवडा निमित्त मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. बाळासाहेब पवार (न्यू आर्टस् कॉलेज, अ.नगर) समवेत प्रा.डॉ. महेबुब सय्यद व प्रा.पी.एन. खरड (राज्यशास्त्र विभाग प्रमुख)



युवा सप्ताह व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. शिरीष लांडगे पाटील, मराठी विभाग प्रमुख व सा.फु.पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रमात सहभागी प्राध्यापकवृंद व प्राध्यापकेतर सेवकवृंद



१ मे २०१९ महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रीय ध्वजास मानवंदना देण्यासाठी उपस्थित असलेले प्राचार्य डॉ.टी. एम. वराट, प्राध्यापक व प्रशासकीय सेवकवृंद




१४ तें ३० सप्टेंबर हिंदी विभाग द्वारा आयोजित हिंदी पखवाडा समारोह के अवसर पर विचार व्यक्त करते हुए प्रा.डॉ. अमोल बागुल, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, हिंदी विभाग अध्यक्ष प्रा. एस.बी. दहातोंडे

# दिन विशेष कार्यक्रम



संस्थेचे संस्थापक लोकनेते सहकारमहर्षी स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील यांच्या ८८ व्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना मा.श्री. बी.टी. गायकवाड, व्याख्याते धनंजय घुले व प्राध्यापकवृंद



संस्थेचे संस्थापक स्व. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांचे १६ वे पुण्यस्मरण दिनी प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व प्राध्यापकवृंद



स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून रांगोळी स्पर्धेचे उद्घाटन करताना मा.श्री.बी.टी. गायकवाड, श्री. धनंजय घुले (अध्यक्ष क्षितिज घुले फाऊंडेशन, दहिगाव ने), प्राचार्य डॉ.टी.एम.वराट व प्रा. एस.व्ही. मरकड



स्व. मारुतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीचे औचित्य साधून रांगोळी स्पर्धेचे परीक्षण करताना मा.श्री.बी.टी. गायकवाड, मा.श्री. धनंजय घुले, प्राचार्य, डॉ. पिसाळ, प्रा. एन.एन. झिंज व प्रा. बी.एस. पवळे



छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित व्याख्यान प्रसंगी इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. विजय कदम (अहमदनगर कॉलेज अ.नगर) यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व मान्यवर



क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व प्राध्यापकवृंद

# विविध उपक्रम




राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त अष्टविनायक ब्लड बँकेच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबीर प्रसंगी माजी तत्त्वज्ञान विभाग प्रमुख न्यू आर्टस कॉलेज अ.नगर येथील डॉ. मोहनराव देशमुख, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व संयोजक



वाङमय मंडळ उद्‌घाटक प्रा.डॉ.शिरीष लांडगे पाटील, अध्यक्ष सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व प्राध्यापकवृंद




राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित केरळ पूरग्रस्तांसाठी निधी संकलित करताना एक क्षण



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी, प्राध्यापकवृंद व मान्यवर




१९ फेब्रुवारी शिवजयंती दिनानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. विजय कदम (इतिहास विभाग प्रमुख अ.नगर कॉलेज, अ.नगर), व्याख्याते शिवशाहीर विक्रम अवचिते, प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, प्रा. गायकवाड व इतिहास विभाग प्रमुख प्रा. एस.व्ही. मरकड



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त विचार व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट

# विविध उपक्रम



मा.आ. चंद्रशेखर घुले पाटील साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालय प्रांगणात वृक्षारोपण करताना नगरसेवक डॉ. सागर बोरुडे (म.न.पा.अ.नगर), प्राचार्य व प्राध्यापकवृंद





लोकनेते स्व. मारुतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचा परिचय करून देताना व्याख्याते मा.श्री. धनंजय घुले, समवेत प्राचार्य डॉ.टी.एम.वराट, मा.श्री. बी.टी. गायकवाड व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.एन.एन. झिंज





राष्ट्रीय सेवा योजना आयोजित 'स्वच्छता हिच सेवा' या उपक्रमांतर्गत स्वच्छतेविषयी जनजागृती करताना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. एस.ए. काळे, प्रा.डॉ.के.आर.पिसाळ, प्रा. बी.एस. पवळे व स्वयंसेवक विद्यार्थी




राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी विकास मंडळ व राज्यशास्त्र विभाग आयोजित लोकशाही पंधरवडानिमित्त मतदार जनजागृती अभियान रॅलीचे आयोजन करण्यात आले. समवेत प्रा.पी.एन.खरड



योग व ध्यान शिबीर प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना योग प्रशिक्षक प्रा. राजन कुमार व विद्यार्थी



योग व ध्यान शिबीर प्रसंगी योगधारणा करताना महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी

# विविध उपक्रम



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चतुर्थ पदवीग्रहण समारंभ प्रसंगी पदवी प्रमाणपत्र स्विकारल्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थी, संस्थेच अध्यक्ष मा.आ. नरेंद्र घुले पाटील, माजी कुलगुरु डॉ. सर्जेराव निमसे, प्राचार्यडॉ.टी.एम. वराट, प्राचार्य बी.जे. अप्पाराव, परीक्षा अधिकारी प्रा.पी.ए. फटांगरे




राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नंदनवन नगर (पोलिस कॉलनी) येथे वृक्षारोपण करताना महाविद्यालयीन विद्यार्थी, श्री. अनिल गायकवाड, प्राध्यापकवृंद व ग्रामस्थ



५ सप्टेंबर शिक्षक दिनानिमित्त स्पर्धा परीक्षा उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना पी.एस.आय. मा.श्री. विनोद चव्हाण (एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, नागापूर) समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट व स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख प्रा.पी.एस. साबळे



महाविद्यालयाच्या सायन्स असोसिएशन या कार्यक्रम प्रसंगी दीप प्रज्वलन करताना डॉ. व्ही.के. धस (पदार्थ विज्ञान प्रमुख, न्यू आर्टस् कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, अ.नगर) समवेत प्राचार्य व प्राध्यापकवृंद



महाविद्यालयात विज्ञान दिनानिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्राचार्य बी.जे. अप्पाराव यांचे शुभहस्ते स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र स्विकारताना कु. पल्लवी थोरात



संगणकशास्त्र विभाग आयोजित प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत प्रसंगी टिपलेला एक क्षण





महाविद्यालयात 'वेषभूषा दिन' साजरा करताना महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी समवेत प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, डॉ. विजय कदम, प्रा.डॉ. आर. आर. सासवडे व प्राध्यापकवृंद



महाविद्यालयात 'साडी डे' साजरा करताना महाविद्यालयीन विद्यार्थीनी व प्राध्यापिकावृंद

# क्रीडा विभाग




जिजामाता महाविद्यालय भेंडे येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सहभागी झालेले महाविद्यालयातील विद्यार्थी एक क्षण




सी.डी. जैन महाविद्यालय श्रीरामपूर येथे झालेल्या आंतर महाविद्यालयी बॉक्सिंग स्पर्धेत पवार मनोहर काशिनाथ (S.Y.BSc) याने ५६ कि.ग्रॅ गटात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल अभिनंदन करताना क्रीडा मार्गदर्श प्रा.अे.के. आहेर




प्रथम वर्ष कला, वाणिज्य व शास्त्र शारीरिक शिक्षण परीक्षा प्रसंगी विद्यार्थ्यांना 'क्रीडा मानसशास्त्र' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. योगिता खेडेकर (न्यू आर्टस् कॉलेज, अ.नगर) समवेत डॉ. शरद मगर, प्रा. ए.के. आहेर



प्रथम वर्ष कला, वाणिज्य व शास्त्र शारीरिक शिक्षण परीक्षा प्रसंगी विद्यार्थ्यांना 'क्रीडा मानसशास्त्र' या विषयावर मार्गदर्शन करताना समवेत डॉ. शरद मगर, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख (न्यु आर्टस् कॉलेज, अ.नगर), प्रा. ए.के. आहेर

# जयकर व्याख्यानमाला व ज्येष्ठ नागरिक शिबीर



३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत डॉ. जयकर व्याख्यानमाला उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे डॉ. विजयकुमार जोशी, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, डॉ. नम्रता पुंड, श्री. आनंद कुलकर्णी, केंद्रवाहक प्रा.जी.एस. सोनवणे



डॉ. जयकर व्याख्यानमालाप्रसंगी प्रमुख व्याख्याते मा.प्रा. चंद्रभान देशमुख यांचा परिचय करून देताना विद्यार्थीनी प्राजक्ता पाटील



डॉ. जयकर व्याख्यानमाला प्रसंगी 'स्वामी विवेकानंद' या विषयावर दुसरे पुष्प गुंफताना प्रा. शत्रुघ्न कदम यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी.एम. वराट



१८ फेब्रुवारी २०१९ रोजी आयोजित एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबीर उद्घाटन प्रसंगी दिप प्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे निवृत्त एस.पी. मा.श्री. आव्हाड साहेब, अध्यक्ष प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, माजी प्राचार्य अशोक आहेर, प्रा.उषा कोरडे, मा.श्री. शब्बीर शेख व प्रा.जी. एस. सोनवणे



एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबीर प्रसंगी मा.श्री. शब्बीर शेख यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ.टी. एम. वराट व मान्यवर



एक दिवसीय ज्येष्ठ नागरिक शिबीर प्रसंगी ज्येष्ठ नागरिकांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे आव्हाड साहेब (निवृत्त एस.पी.)

# निरोप समारंभ



तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या निरोप समारंभ प्रसंगी महाविद्यालयास भेट वस्तू देताना तृतीय वर्ष रसायन शास्त्र विषयाचे विद्यार्थी व प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्रा. डॉ.के. आर. पिसाळ, शास्त्र शाखा प्रमुख प्रा.बी. एस. पवळे



तृतीय वर्ष कला निरोप समारंभ प्रसंगी भेट स्विकारताना महाविद्याचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, कलाशाखा प्रमुख प्रा.एस.व्ही. मरकड, प्रा. एफ.बी.खान, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष श्री. महेंद्र धामणे



तृतीय वर्ष वाणिज्य निरोप समारंभ प्रसंगी भेट वस्तू स्विकारताना प्राचार्य डॉ. टी.एम. वराट, वाणिज्य शाखा प्रमुख प्रा. के. बी. ताके, प्रा. एफ बी. खान, प्रा. एस.व्ही. मरकड




तृतीय वर्ष कला, वाणिज्य निरोप समारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर शुभेच्छा देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट

# माजी विद्यार्थी संघ




माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, माजी विद्यार्थी संघ अध्यक्ष श्री. महेंद्र धामणे, प्रा. एस.व्ही. मरकड व माजी विद्यार्थी



माजी विद्याथी मेळावा निमित्त विविध क्षेत्रात कार्यरत असलेले माजी विद्यार्थी एकत्र आल्यानंतर टिपलेला एक क्षण

# गद्य विभाग

# गद्य विभाग


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव |
|---|---|---|
| १ | तणाव कारणे, दुष्परिणाम व उपाय | सुप्रिया भिंगारदिवे |
| २ | नेताजी सुभाषचंद्र बोस | प्रा.बी.बी. माताडे |
| ३ | विज्ञान युगातील अग्निपंख | अक्षदा सुनिल चौरे |
| ४ | स्पर्धा परीक्षा नियोजन | रेवणनाथ खंडागळे |
| ५ | चला मतदान करूया ! | प्रा. पुनम एन. खरड |
| ६ | आजची स्त्री | तेजस्विनी प्रकाश पवार |
| ७ | सुशिक्षितांची अंधश्रध्दा | कल्याणी किनकर |
| ८ | करियरची दिशा | प्रा. के. बी. ताके |
| ९ | आजच्या काळातील गणेश उत्सवाचे स्वरूप | दिपाली दिलीप कराळे |
| १० | सहवास | सुरेखा गिऱ्हे |
| ११ | स्वच्छ भारत अभियान | प्रविण कृष्णा मोरे |
| १२ | मानवी विकास व भाषा शिक्षण | रेणुका जालिंदर घोलप |
| १३ | विज्ञान आणि मानवी जीवन | अंजली बबनराव भुतकर |
| १४ | हिंदी भाषा में रोजगार के अवसर | प्रा. एस. बी. दहातोंडे |
| १५ | C. V. Raman | Poonam Upendra Singh |
| १६ | Chemistry In Everyday Life | Arbaj Shaikh |
| १७ | Dr. A.P.J. Abdul Kalam | Asif Ajij Pathan |
| १८ | Universal Donor & Universal..... | Prof. P. P. Jagtap |
| १९ | Politics of India | Puja Vijay Bhor |

# तणाव कारणे, दुष्परिणाम व उपाय

आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये तणाव ही समाजाला भेडसवणारी एक प्रमुख समसया बनली आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात तणावाचा अनुभव कधी ना कधी घेतला असेल. लहान-थोर, पुरुष-स्त्रिया सर्वांनाच कमी जास्त प्रमाणात तणाव हा असतोच आपल्यावरील तणाव आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर अनिष्ट परिणाम तर करतोच; पण त्याचबरोबर समाजातील बऱ्याच समस्या व विकृती यांनाही तो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या जबाबदार असतो. संथगतीने मृत्युकडे नेणारी अशी ही व्याधी आहे.

तणाव म्हणजे काय ? कोणत्याही प्रसंग अथवा प्रासंगिक बदलाला आपण दिलेला नकारात्मक शारीरिक व भावनिक प्रतिसाद म्हणजे तणाव. तणाव निर्माण करणारा प्रसंग मोठाच असला पाहिजे असे नाही, तर आपल्याला क्षुल्लक वाटणारा प्रसंगदेखील एखाद्या व्यक्तीमध्ये तणाव निर्माण करु शकतो. उदा. दूध उतू जाणे, नेहमीची बस चुकणे, कार्यालयात जायला उशीर होणे, दूरध्वनी लगेच न लागणे, गृहपाठ न होणे इत्यादी.

तणावाची कारणे - तणाव निर्माण होण्याची मुख्यतः दोने कारणे असतात.

१) बाह्य - एकूण तणाव निर्मितीमध्ये बाह्य घटकांचा केवळ ५-१० टक्के एवढाच वाटा असतो. उदा. कामांच्या ठिकाणचे व घरातील वातावरण, आर्थिक स्थिती, सामाजिक समस्या प्रकृती अस्वास्थ इत्यादी.

२) आंतरिक - एकूण तणाव निर्मितीमध्ये आंतरिक घटकांचा ९०-९५ टक्के वाटा असतो. आधुनिक जीवन प्रणालीमुळे तणाव निर्माण होतो असे म्हटले जाते परंतु कोणतीही परिस्थिती ही स्वतः तणावपूर्ण नसते. एखाद्याच्या स्वभावानुरुप त्या परिस्थितीकडे पाहण्याच्या त्याच्या दृष्टिकोनावर सर्व अवलंबून असते. स्वभावातील काही दोषांमुळे नेहमीची परिस्थितीदेखील कशी तणाव निर्माण करू शकते, याची काही उदाहरणे पाहूया.

अ) आत्मविश्वासाचा अभाव - आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली की, व्यक्ती तणावग्रस्त होते.

आ) हळवेपणा - रस्त्यात भेटलेला मित्र बघून बसला नाही म्हणून तणाव

इ) लाजणे - अपरिचित व्यक्तीशी बोलताना तणाव.

ई) न्यूनगंड असणे - आपल्यापेक्षा श्रेष्ठ व्यक्तिंच्या सानिध्यात तणाव

**तणावाचे दुष्परिणाम** - तणावाच्या दुष्परिणामांची दोन गटात विभागणी करता येते.

अ. शारीरिक - पित्ताचा विकार, भूक न लागणे, वजन कमी होणे, हृदयरोग, दमा, रक्तदाब मधुमेह, यकृत/मूत्रपिंड आदींचे विकार इत्यादी.

आ. मानसिक - लगेच दमणे, अतिरिक्त राग येणे, विकृत व्यक्तिमत्वे, निरुत्साह उदासीनता निद्रानाश, विस्मरण, भावनाविवशता, इत्यादी.

**उपाययोजना - तणावावर सर्वसाधारणपणे दोन स्तरावर उपाययोजना केल्या जातात**

**अ) शारीरिक स्तरावर उपाय** - उदा. झोपी जाणे, कामावरून सुट्टी घेणे, सहलीला जाणे, मसाज घेणे, व्यायाम करणे इत्यादी. यात केवळ कृतीच्या स्तरावर उपाय असल्यामुळे सुधारणा अगदी तात्पुरतीच असते. बऱ्याच वेळा तणावपूर्ण परिस्थितीपासून पूर्णतः बाजूला जाणे शक्य नसते. तसेच एका ठिकाणावरून दुसरीकडे गेल्यास तिथेही ताण निर्माण होऊ शकतो.

**आ) मानसिक स्तरावर उपाय** - मानसोपचार, संमोहन उपचार इत्यादी. यात केवळ कृतींच्या

स्तरावरच नव्हे तर ज्यापासून कृतींचा उगम होते त्या विचारांच्या स्तरावर उपचार केले जातात. त्यामुळे काही काळ सुधारणा टिकू शकते म्हणुन हे दोन्ही उपाय हे कायम स्वरूपी उपाय नव्हती. आपल्यापैकी प्रत्येकाची मग तो कारकून असो की देशाचा पंतप्रधान असो, एक सामाईक व अगदी माफक इच्छा असते की दररोज रात्री आपल्याला शांत झोप लागावी व सकाळी उठल्यावर आपण आनंदी व उत्साही असावे. आपण सर्वजण आनंदाच्या शोधात धडपत असतो आणि दुःख टाळण्याचा सतत प्रयत्न करत असतो परंतु लक्षात असे येते की, सर्वसाधारणपणे जीवनात २५ टक्के सुख व ७५ टक्के दुःख असते. याचे कारणे म्हणजे आपली आजची शिक्षण व्यवस्था आनंदी कसे राहावे ते शिकवत नाही.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला दररोज वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. (तात्कालिक उदा. द्यावीत) सकाळी वेळेवर गाडी पकडण्यापासून ते मुलांच्या शाळा प्रवेशांपर्यंत अनेक समस्या आपल्या मनावर कळत नकळत ताण निर्माण करत असतात. सतत तणावाखाली राहिल्याने आपल्याला त्याचे अनिष्ट परिणामही भोगावे लागतात.

**तणाव निर्माण होण्याची कारणे, त्याचे परिणाम व तणाव दूर करण्याचा कायमस्वरूपी उपाय :**

तणाव म्हणजे काय तर कोणत्याही प्रसंगाला किंवा बदलाला आपण दिलेला नकारात्मक शारीरिक व भावनिक प्रतिसाद. मनातील अनावश्यक व नकारात्मक विचारांच्या गर्दीमुळे मनाची जी स्थिती होते तिला तणाव' असे म्हणतात. आज आबालवृध्द सर्वांनाच ताण सहन करावा लागत आहे. त्यामुळेच मानसोपचार तज्ज्ञांकडील रुग्णाची गर्दी वाढत आहे. मनावर ताण येण्यासाठी प्रसंग/समस्या फार मोठी असावी लागते असे नाही. कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलांना मेजवानीला जाताना कोणते कपडे घालावेत. महिलांना पाहुणे वाढले की स्वयंपाक कसा पुरवायचा. कर्मचाऱ्यांना वरिष्ठांशी बोलताना ताण येतो. एवढेच नाही तर क्रिकेटचा सामना बघताना सचिन शून्यावर बाद झाला तरी अनेकांना ताण येतो. भूतकाळातील अप्रिय घटना, संवाद साधता न येणे इत्यादी कारणांमुळेही ताण येऊ शकतो.

ताण निर्माण करणाऱ्या घटकांमध्ये आणखी एका महत्त्वाच्या व मूलभूत घटकाचा विचार केला पाहिजे. तो म्हणजे 'आध्यात्मिक घटक' रज-तम कणांची निर्मिती हा व्यक्तीगत तसेच सामाजिक स्तरावर तणाव निर्मितींचे मूळ कारण असलेला घटक आहे. स्वार्थ, आळस, निष्क्रियता, हिंसाचार ही रज-तमांची दृश्य लक्षणे आहेत. तर सत्त्वकणांमुळे आनंद, समाधान, शांती याचा अनुभव येतो. आपणही ते कसे अनुभवू शकतो ते पाहूया.

**तणावाचा परिणाम –**

आपल्यापैकी अनेकांनी ते कधी ना कधी अनुभवलेले असतील. तणावामुळे पित्त वाढणे, भूक न लागणे, वजन कमी होणे, दमा, रक्तदाब, मधुमेह इ. विकार होऊ शकतात. तसेच अति राग येणे, निरुत्साह उदासीनता, निद्रानाश, विस्मरण, कशातच रस न वाटणे, सतत दुःखी राहणे असे मानसिक त्रास होऊ शकतात. तणावग्रस्त व्यक्तिची कार्यक्षमता कमी होते. ती योग्य निर्णय घेऊ शकत नाही. स्वतः आनंदी राहू शकत नाही व इतरांनाही आनंद देऊ शकत नाही.

तणाव कोणालाही नको असतो म्हणून तो दूर करण्याचे विविध प्रयत्न आपण करतो. झोप घेणे, सहलीला जाणे, मसाज घेणे, मानसोपचारतज्ज्ञांकडे जाणे इत्यादी उपाय आपण करतो पण त्यांचा उपाय थोडा काळ टिकतो व नंतर पुन्हा आपण तणावग्रस्त होतो. काही जण तणाव दूर करण्यासाठी सिगारेट, दारु यासारख्या व्यसनांचा आधार घेतात परंतु त्याचा

अंमल असे पर्यंतच ताण दूर झाल्यासारखे वाटते. नंतर ताण पुन्हा येतो. त्यामुळे हे उपाय बाह्य असून वरवरचे आहेत असे लक्षात येते. असे जर आहे तर मग आपण आनंदीच का नाही राहायचे ! आनंद दिल्याने वाढतो. त्यामुळे आपल्याला प्रश्न पडला असेल की, ही गुरुकिल्ली द्यायची कशी ? आपले कुटुंबीय, मित्र मैत्रिणी, नातेवाईक, सहकारी यांना आपण कायमचे आनंदी कसे रहायचे हे सांगू शकतो व कायमचे तणावमुक्त होऊ शकतो.

**व्यवस्थापन तणावाचे –**

तणाव कशामुळे निर्माण होतो ?

१) स्वभाव, गुणधर्म, संशयीपणा, कमी आत्मविश्वास, न्यूनगंड, अपराधीपणाची भावना, ईर्षा, भीती, अहंकार, राग, द्वेष २) आपला व्यवसाय ३) वातावरण

**जीवघेणी स्पर्धा**

**ताणाव टाळण्याचे तात्पुरते उपाय**

१) कुठल्याही गोष्टीवर तात्काळ प्रतिक्रिया देणे टाळा. २) जे तुम्हांला आत्मविश्वास देऊ शकतात त्यांच्याशी चर्चा करा. ३) खूप जास्त कामाचा ताण असल्यास प्राधान्यक्रम ठरवून काम करा.

४) आपल्या व्यवसायापेक्षा भिन्न छंद जोपासा.

५) कुटुंबासोबत सहलीला जा, आनंदाचे क्षण आठवा. ६) डोळे बंद करून आपले आवडते संगीत ऐका. ७) रात्रीच्या वेळी चांदणे बघा.

८) दिवसातून एकदा डोळे बंद करून विचारप्रक्रिया हळूहळू थांबवा. ९) दीर्घश्वास घेऊन तो सोडत तणावालाही बाहेरचा रस्ता दाखवा.

१०) श्वासाकडे लक्ष द्या. ११) व्यायाम करा.

**– सुप्रिया भिंगारदिवे**
एस.वाय.बी.ए.

# नेताजी सुभाषचंद्र बोस

आजाद हिंद सेनेचे सरसेनापती आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील थोर नेते सुभाषचंद्र बोस यांचे मूळ घराणे बंगालमधील होते. आपल्या वकीलीच्या व्यवसायानिमित्त त्यांचे वडील ओरिसातील कटक या गावी स्थायिक झाले. त्यांच्या आईचे नाव प्रभावतीदेवी व वडिलांचे नाव जानकीनाथ बोस होते. प्रभावतीदेवी व जानकीनाथ बोस यांना एकुण चौदा मुले होती. त्यामध्ये सुभाषचंद्र बोस हे त्यांचे नववे अपत्य होते. त्यांचा जन्म २३ जानेवारी १८९६ रोजी झाला. बालपणी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यावर त्यांच्या मातोश्रीने चांगले संस्कार केले.

लहानपणापासुनच सुभाषचंद्र बोस हे कुशाग्र बुध्दिमत्तेचे होते. शाळेत असतानाच स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला. इ.स. १९१३ मध्ये मॅट्रिकच्या परीक्षेत ते सर्व विद्यापीठातून दुसरे आले होते. पुढील शिक्षणासाठी त्यांनी कॉलजमध्ये प्रवेश घेतला. पण त्यांचे मन शिक्षणात रमेनासे झाले. ते सद्गुरुच्या शोधार्थ निघाले. त्यांनी काशी, हरिद्वार, ऋषिकेश, मथुरा, हिमालय असा प्रवास केला. त्यामध्ये योग्य असा गुरु न मिळाल्यामुळे ते पुन्हा शिक्षणाकडे वळले.

कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना तेथील एका इंग्लंडमधील प्राध्यापकाने भारतीय लोक कुत्रे आहेत असे विधान केले. त्या विधानाचा राग अनावर होऊन त्यांनी त्या प्राध्यापकाच्या कानशिलात भडकावून दिली. परिणामी सुभाषचंद्र बोस यांना कॉलेजातून काढून टाकण्यात आले. पण आशुतोष मुखर्जींच्या प्रयत्नाने स्कॉटिज चर्चमधील कॉलेजात प्रवेश मिळवुन ते बी.ए. झाले. त्यानंतर वडिलांच्या आज्ञेनुसार आय.सी.एस. होण्यासाठी ते इंग्लंडला रवाना झाले.

सुभाषचंद्र बोस आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण होऊन इ.स. १९२० मध्ये भारतात परतले. त्यानंतर इ.स. १९२१ मध्ये झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांडाने त्यांच्या मनात संतापाची लाट उसळली. त्याचवेळी त्यांनी निर्णय घेतला की, इंग्रजांची नोकरी करून गुलामी न करता मातृभूमी स्वतंत्र करण्यासाठी लढा द्यायचा. त्यासाठी त्यांनी २० जुलै १९२१ रोजी मुंबई येथे महात्मा गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधीजींनी त्यांना कलकत्त्याला डॉ. चित्तरंजन दास यांच्याकडे पाठविले. त्यानंतर डॉ. चित्तरंजनदास व सुभाषचंद्र बोस यांचे गुरु-शिष्याचे नाते निर्माण झाले. डॉ. चित्तरंजनदास यांच्या मार्गदर्शनानुसार कलकत्ता येथे त्यांनी कार्य केले. त्यावेळी झालेल्या महापालिका निवडणुकीमध्ये डॉ. चित्तरंजनदास हे बहुमताने विजयी होऊन महापौर झाले. त्यावेळी सुभाषचंद्र बोस यांना त्यांनी स्थायी समितीवर घेतले. त्यावेळी त्यांनी सर्व रस्त्यांची इंग्रजी नावे बदलून भारतीय नावे देण्याचे काम केले.

त्यानंतर सुभाषचंद्र बोस हे काँग्रेस पार्टीचे युवा नेता बनले. इ.स. १९२७ मध्ये सायमन कमिशन भारतात आले. त्यावेळी काँग्रेसने त्यास आंदोलन करून विरोध केला. यावेळी कलकत्त्यामध्ये सुभाषचंद्र बोस यांनी नेतृत्व करून विरोध केला. तसेच इ.स. १९२५ मध्ये 'क्रांतिकारक गोपीनाथ साहा' यांना मदत केले म्हणून इंग्रजांनी त्यांना म्यानमार येथील मंडाले कारागृहात बंदिस्त करून ठेवले. तेथे ते तुरुंगात असताना ५ नोव्हेंबर १९२५ रोजी डॉ. चित्तरंजनदास यांचा मृत्यू झाल्याचे त्यांना रेडिओवरून समजले. या घटनेने त्यांच्या मनावर जबरदस्त परिणाम होऊन तब्बेत खराब झाली. त्यानंतर इ.स. १९३० साली तुरुंगात असताना कलकत्ता येथे त्यांची महापौर म्हणून निवड झाली. त्यामुळे इंग्रजांना त्यांना तुरुंगातून सोडावे लागले.

इ.स. १९३२ मध्ये पुन्हा त्यांना तुरुंगात ठेवण्यात आले. तुरुंगामध्ये असताना त्यांची प्रकृती खराब झाली. त्यासाठी त्यांनी यूरोपमध्ये औषधोपचार करण्यास परवानगी मागितली. इ.स. १९३३ मध्ये ते आजारपणावर इलाज करण्यासाठी यूरोपला गेले. त्यानंतर ते ऑस्ट्रेलियात व्हिएन्ना येथे वास्तव्यासाठी गेले. या काळात ते भारत स्वतंत्र करण्यासाठी मुसोलिनी यांना भेटले. याच काळात इ.स. १९३४ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. आपल्या वडिलांच्या अंत्यविधीसाठी भारतात आले असताना इंग्रजांनी त्यांना अटक केली. तुरुंगात गेल्यानंतर पुन्हा त्यांची शरीर प्रकृती बिघडली. त्यामुळे पुन्हा ते यूरोपला गेले. यूरोपला गेल्यानंतर पुस्तक लिहित असताना एका टाइपिस्ट मुलीशी त्यांची ओळख झाली. त्याचे रुपांतर प्रेमात होऊन इ.स. १९४२ मध्ये त्यांनी हिंदु पद्धतीने विवाह केला. त्यानंतर त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव त्यांनी अनिता ठेवले.

भारतीय स्वातंत्र्याची ओढ असल्यामुळे लग्न होऊनही त्यांचे मन संसारात रमले नाही. भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी त्यांनी इ.स. २९ मे १९४२ मध्ये आपल्या जर्मनीतील एका मित्राच्या मदतीने जर्मनीचा सर्वोच्च नेता एडॉल्फ हिटलर यांची भेट घेतली. या भेटीत हिटलरने मदत करण्याचे आश्वासन दिले नाही. मात्र या भेटीत त्याने लिहिलेल्या 'माइन काम्प' या आत्मचरित्रात भारतीयांविषयी लिहिलेला चुकीचा मजकूर सुभाषचंद्र बोस यांनी काढावयास लावला. यानंतरही ते भारतीय स्वातंत्र्यासाठी अहोरात्र धडपडत होते. त्यातूनच ते ८ मार्च १९४३ रोजी इंडोनेशियाला गेले. तेथे ते वयोवृध्द क्रांतिकारक रासबिहारी बोस यांना भेटले. रासबिहारी बोस यांच्यामुळे त्यांनी सिंगापूरमध्ये स्वतंत्र परिषदेचे नेतृत्त्व केले.

यानंतर सुभाषचंद्र बोस यांनी जपानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांची भेट घेऊन भारतीय स्वातंत्र्यासाठी मदत मागितली. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे विचार ऐकून ते प्रभावित झाले

व त्यांनी नेताजींना सहकार्य करण्याचे वचन दिले. त्यानंतर नेताजींनी टोकियो येथे जपान संसदेसमोर भाषण करून सर्वांना प्रभावित केले.

त्यांतर २१ ऑक्टोबर १९४३ मध्ये त्यांनी सिंगापूर येथे आजाद हिंद सेनेची स्थापना केली. या सेनेला एकुण नऊ देशांनी मान्यता दिली. त्या सेनेचे प्रमुख ते स्वतः बनले. आजाद हिंद सेनेमध्ये विविध देशातील अनेक भारतीय लोक भरती झाले. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आवाहन केले की, 'तुम मुझे खून दो । मै तुम्हे आजादी दूँगा'।। तसेच आजाद हिंद सेनेमध्ये महिलांची भरती करून त्याला त्यांनी 'झाँसी की रानी रेजिमेंट' हे नाव दिले.

दुसरे महायुद्ध सुरु असताना आजाद हिंद सेनेने जपानची मदत घेऊन भारतावर आक्रमण केले. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी 'चलो दिल्ली' हा नारा दिला. यावेळी त्यांनी अंदमान निकोबार ही बेटे जिंकून घेतली त्यांना नेताजींनी शहीदद्विप आणि स्वराज द्विप ही नावे दिली. नंतर त्यांनी इंफाळ व कोहिमा या ठिकाणी हल्ला केला. पण तेथे त्यांचा पराभव झाला. त्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली. त्यांच्या या धाडसामुळे संपूर्ण भारतात त्यांचे कौतुक झाले. महात्मा गांधीजींनी त्यांचे हे कार्य पाहून सुभाषचंद्र बोस यांना 'नेताजी' ही पदवी दिली. भारतीय स्वातंत्र्यासाठी महान धाडस व संघर्ष केलेल्या नेताजींचे १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान दुर्घटनेत निधन झाले. त्यांनी केलेले कार्य व त्यांचे विचार हे भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांना सदैव प्रेरणादायी ठरले.

**– प्रा. बी.बी. माताडे**
वनस्पतीशास्त्र विभाग

# विज्ञान युगातील अग्निपंख

डॉ ए.पी.जे अब्दुल कलाम हे जगातील प्रख्यात शास्त्रज्ञात एक आहेत. वैज्ञानिक, क्षेत्रात तसेच संशोधक, शिक्षक आणि भारताचे राष्ट्रपती या सर्व पदावर त्यांनी कार्य केले. या कार्यातून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकीर जैनुलाअबदिन अब्दुल कलाम होय. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी रामेश्वर(तामिळनाडू) येथे झाला. त्यांचे वडिल रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरुना होडीतून नेण्याचे-आणण्याचे काम करत. लहान वयातच वडिलांचे छत्र गमावल्याने त्यांचे बालपण कष्टात गेले. ते वर्तमानपत्र विकून तसेच इतर छोटी-मोठी कामे करून आपले शालेय शिक्षण रामनाथपुरमला पूर्ण केले. शाळेत असताना त्यांना गणिताची विशेष आवड होती. नंतर ते तिरुचिरापल्ली येथे सेंट जोसेम कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बी.एस्सी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी लागणारे पैसेही त्यांच्याजवळ नव्हते. बहिणीने स्वतःचे दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले.१९६० साली या संस्थेतून एरॉनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केला व त्यानंतर अमेरिकेतील नासा या प्रसिध्द संशोधन संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले.

अब्दुल कलाम यांच्या१९५८ ते १९६३ या काळात संरक्षण संशोधन व विकास संस्थेशी (DRDO)संबंध आला. १९६३ मध्ये ते भारतीय अवकाश संशोधन संस्थेत(इस्त्रो) क्षेपणास्त्र विकासातील PSLV-सॅटेलाईट लॉन्चिंग व्हेईकलच्या संशोधनात भाग घेऊ लागले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा कार्यक्रम हाती घेतला. त्या वेळी डॉ.कलाम पुन्हा DRDO मध्ये

आले. वैयक्तिक कामापेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असे व सहकार्यांमधील उत्तम कला त्यांच्यामध्ये होती. क्षेपणास्त्र विकास कार्यामधील अग्निक्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीमुळे डॉ.कलाम यांचे जगभरातून कौतुक झाले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

विज्ञान क्षेत्रात महारथ यश प्राप्त असणारे डॉ.कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रवीणा वाजविण्याचा, मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकराने १९७१ 'पद्मभूषण, तर १९९० ला 'पद्मविभूषण व १९९८ मध्ये 'भारतरत्न हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला. बालपण अथक परिश्रमात व्यतीत करून विद्येची अखंड साधना करीत खडतर आयुष्य जगलेले आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी विराजमान झालेले डॉ.कलाम हे आपल्या आगळ्या कार्यपद्धतीमुळे लोकांचे राष्ट्रपती म्हणून लोकप्रिय झाले.

डॉ. कलाम हे पुढील २० वर्षात होणाऱ्या विकसित भारताचे स्वप्न ते सतत पाहत असत त्यांनी तंत्रज्ञान माहितीपूर्वानुमान मूल्यमापन मंडळाचे अध्यक्ष या नात्याने 'इंडिया व्हिजन २०२०' या २०२० पर्यंत भारतास आर्थिकदृष्ट्या विकसित करण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या प्रकल्पाची सुरुवात केली. २००२ ते २००७ या काळात राष्ट्रपतीपद भूषविणाऱ्या कलाम यांना३८ विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवी बहाल केली. त्याचबरोबर त्यांना अनेक पुरस्कार व मान सन्मान मिळाले आहेत. कलाम यांचे साहित्य क्षेत्रातही खूप मोठे योगदान आहे. त्यांनी विविध विषयावरील १५ पुस्तके लिहिली असून जगातील विविध भाषांमध्ये ती अनुवादीत झालेली आहेत. तसेच अग्नीपंख (wings of fire) हे आत्मचरित्र विशेष लोकप्रिय आहे तर 'सायंटिस्ट टू प्रेसिडेंटम हे आत्मकथन तसेच 'माय जर्नी' हा कविता संग्रह प्रसिध्द आहे. आपल्या मेहनतीच्या जोरावर संपूर्ण जगाला आपल्या कार्याची दखल घ्यायला लावणारे कलाम हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. शिलाँग येथील आय.आय.एम च्या एका कार्यक्रमात व्याख्यान देताना त्यांची प्रकृती बिघडली व शिलाँगमधीलच एका रुग्णालयात त्यांनी २७ जुलै २०१५ रोजी या जगाचा अखेरचा निरोप घेतला. त्यामुळे विज्ञान जगातील एक तेजस्वी विज्ञानयुगाचा अंत झाला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य हे देशसेवेसाठी तसेच विज्ञानक्षेत्राच्या विकासासाठी अर्पण केले.

डॉ. कलाम यांचे काही प्रेरणादायी विचार:-

१. आप अपना भविष्य नही बदल सकते, लेकीन अपनी आदते बदल सकते है और निश्चितरूप से आपकी आदते आपका भविष्य बदल देंगी|

२. जिस दिन हमारे सिग्नेचर ऑटोग्राम में बदल जाये तो मान लिजिये आप कामयाब हो गये|

३. ब्लैक कलर भावनात्मक रूप से बुरा होता है लेकीन हर ब्लैक बोर्ड विद्यार्थियो की जिंदगी ब्राईट बनाता है|

४. सपने वह नही होते है जो हम देखते है सपने वह होते है जो नींद ही नही आने देते|

**– अक्षदा सुनिल चौरे**
टी.वाय.बी.कॉम

# स्पर्धा परीक्षा नियोजन

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे हे आपणास माहीतच असेलच. स्पर्धेत टिकण्यासाठी योग्य त्यावेळी योग्य तो निर्णय घेणे महत्वाचे असते. त्यासाठी सातत्यही महत्त्वाचे असते. कोणतीही गोष्ट हि सातत्याने साध्य होते. त्यासाठी जिद्द, मेहनत, चिकाटी महत्त्वाची असते. त्यानंतर यश आपणास आपोआप मिळते.

आजचा लेख हा स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यासाठी खूप महत्वाचा ठरेल यात शंकाच नाही. प्रथम आपण कोणत्या शाखेत शिकतो आहोत.जर कला शाखा असेल तर आपणास कमी लेखायचे कारण नाही. मित्रांनो थोडा विचार करा की, जिल्ह्याचा जिल्हाधिकारी एकच असतो. तो कला शाखेतूनसुध्दा होऊ शकतो.

मित्रांनो, आपण पदवीच्या प्रथम, द्वितीय वर्षात असाल तर आपणास स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर खालील बाबींनुसार अभ्यासाचे नियोजन केले तर आपणास यश आपोआप मिळेल.

आपण आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. ते पण आपल्या आवडीनुसार करणे गरजेचे आहे. ध्येय निश्चित केले नाही तर आपण एस.टी स्टँडवर आलो आहोतपण आपणास कोठे जायचे हे माहीतच नाही अशी आपली गत होईल. त्यासाठी आपले ध्येय निश्चित करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर वेळेचे नियोजन आपण केले पाहिजे. त्यामध्ये कोणत्या वेळी कोणत्या विषयाचा अभ्यास करायचा. आयोगाचा पेपर कोणत्या वेळी असतो याची माहिती घेणे गरजेचे असते. शक्यतो पेपर दुपारी असतो. त्यामुळे जास्तीत जास्त प्रश्नपत्रिका दुपारी सोडवाव्यात. वेळेचे नियोजन करताना सेकंदापासून ते वर्षापर्यंत केले पाहिजे.

आपणास ज्या पदावर जायचे आहे त्याचे योग्य ते मार्गदर्शन आपण ज्या व्यक्ती त्या पदावर कार्यरत आहेत त्यांच्याकडून घेतले पाहिजे. तसेच पुस्तके कोणती वापरावीत क्लासेस करायचे असेल तर कोठे करावेत याची माहिति घ्यावी. त्यामुळे आपला वेळ व पैसा वाया जाणार नाही.

या सर्व गोष्टींची आपण माहिति घेतल्यानंतर प्रत्यक्ष अभ्यास करण्यास सुरुवात करावी. अभ्यासामध्ये सातत्य असायला हवे. त्यासाठी प्रथम विवेकानंद यांनी सांगितल्याप्रमाणे मनाची एकाग्रता महत्त्वाची असते. मनाची एकाग्रता नसेल तर अभ्यास केलेला लक्षात राहणार नाही. सातत्य असेल तर मनाची एकाग्रता आपोआप वाढते. उदा. एडिसनने १००० प्रयोग केले तेव्हा बल्बचा शोध लागला. जर त्याने ९९९ वेळा प्रयोग करून सोडून दिले असते तर आज जग अंधारात असते. अभ्यास करत असताना चर्चा करून अभ्यास केला पाहिजे. कारण चर्चा करताना लहानात लहान घटकापर्यंत आपण पोहोचतो. चर्चा अभ्यासातून भरकटता कामा नये.

स्पर्धा परीक्षा अभ्यास करताना वाईट गोष्टीकडे दुर्लक्ष केले पाहिजे. त्यासाठी एकच गोष्ट लक्षात ठेवा. छन्नीचे घाव सोसल्या शिवाय देवपण येत नाही. चांगल्या रस्त्याला गतिरोधक असतातच. तसे चांगले काम(अभ्यास) करणाऱ्या व्यक्तीस विरोधक असतात. एका गोष्टीचा येथे आवर्जून उल्लेख करेल की, आपले सध्याचे वय हे पाण्याच्या प्रवाहासारखे असते. आपण चांगल्या गोष्टीकडे वाहत गेलो तर अति उत्तम. जर वाईट गोष्टीकडे वाहत गेलो तर पुढे खूप अवघड आहे.

मानवी जीवनात कर्तृत्वाला मर्यादा आहेत. एकदा अपयश आले म्हणून थांबायचे नाही. म्हणतात ना अपयश हि यशाची पहिली पायरी असते. जो जिंकतो तो हरणाऱ्यामुळेच. जो हरतो तो जिंकणाऱ्यामुळेच हरतो दोघांना एकमेकांची गरज असते त्यामुळे अपयश पचवण्याची आपली तयारी असली पाहिजे. अशा प्रकारे जर आपण स्पर्धा परीक्षांची तयारी मनापासून केली तर यश निश्चित मिळते. सर्व स्पर्धा परीक्षा अभ्यासक विद्यार्थ्यांना

माझ्या मनापासून शुभेच्छा!

**– रेवणनाथ खंडागळे**
एफ.वाय.बी.ए.

# चला मतदान करूया !

आपण या भूमीवर जन्म घेतला तो फक्त आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो म्हणून. म्हणजेच आपल्या हातून काहीतरी दान व्हावे. दानाचे अनेक प्रकार आपणास माहित आहे. अन्नदान, नेत्रदान, भूदान, जीवनदान, कन्यादान, रक्तदान, बलिदान व मतदान इत्यादी. तर दान म्हणजे आपण दुसऱ्याला काहीतरी मनःपूर्वक देणे होय. दान अनेक प्रकारे व अनेक माध्यमाच्या आधारे करता येते. यामध्ये मतदान हे लोकशाहीने समाजाला दिलेली दानाची एक पवित्र संधी आहे. मतदान हा एक दानाचाच महत्वाचा प्रकार आहे.

**मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो !**
**देश वाचवा, लोकशाही वाचवा !**

आपला भारत देश हा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक हा महत्वाचा घटक असतो. दर पाच वर्षाने विधानसभा व लोकसभेच्या निवडणूका होत असतात. आपण ह्या निवडणुका आल्यावर मतदान करत असतो. आपले व आपल्या देशातले अनेक प्रश्न सोडवण्यासाठी एक हक्काचा माणूस आपण विधानसभा व लोकसभेत पाठवतो.

मित्रहो, आपल्या भारत देशाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. लोकसंख्येबरोबर भारतात अनेक समस्या ही वाढत आहे. भारताला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी अनेक क्रांतीकारकांनी या भूमीवर रक्त सांडले आहे. त्या क्रांतिकारकांचे स्मरणही आपण कायम केले पाहिजे. देशाचे सैनिक हे सुध्दा आपल्या प्राणाची पर्वा न करता आपल्या भारतमातेच्या संरक्षणासाठी रात्रंदिवस धडपत आहेत. म्हणून क्रांतीकारक व सैनिक यांच्याप्रती आपण नेहमी स्नेहाची भावना मनात जपली पाहिजे. त्यांना वंदन केले पाहिजे. लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये सर्वसामान्यांचे प्रश्न व देशासमोरील आव्हानात्मक प्रश्न व देशहितांसाठी लोकप्रतिनिधीनी कार्य केले पाहिजे. विविध प्रश्न सोडविले पाहिजे. मात्र तसे होताना दिसत नाही. निवडणुकीत निवडून गेलेले लोकप्रतिनिधी पाच वर्ष लोकांना त्यांचे तोंडही कधी दाखवित नाही.

सर्वसामान्यांचे प्रश्न न सोडवता स्वतःचा प्रपंच कसा मोठा होईल हेच त्यांचे धोरण असते. आज महाराष्ट्रात शेतकरी, मजुर, सुशिक्षित, तरूण वर्ग, महिला वर्ग, बेरोजगार यांचे असंख्य प्रश्न धुळखात पडले आहेत. त्यामुळे संपूर्ण समाज रसातळाला गेला आहे. यामधून जर मार्ग काढायचा असेल तर तरुणांच्या हाताला काम मिळाले पाहिजे. त्यांचे ज्वलंत प्रश्न सुटले पाहिजे अशी अपेक्षा आहे. म्हणुन संधीसाधू व स्वार्थी वृत्तीच्या उमेदवारास मतदान करू नका. आज आपल्या भारत देशात काश्मीर सीमावाद, दहशतवाद, नक्षलवाद हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न आहेत. देशात युध्दजन्य परिस्थिती नसताना अनेक जवान शहीद होतात. अनेकांचे संसार उघड्यावर पडतात. कुठपर्यंत चालणार हे ? याचा विचार करण्याची आज गरज आहे ! देशात गुप्तचर यंत्रणा असताना हल्ले होतात कसे ? पूर्वी लालबहाद्दूर शास्त्री यांनी नारा दिला होता, ''जय जवान, जय किसान'' ! भारत तर लोकशाही प्रधान देश आहे. मग जवान आणि किसान यांची काय केविलवाणी अवस्था आजच्या लोकशाहीतल्या नेत्यांनी करून ठेवली आहे. लालबहाद्दूर शास्त्री यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात तर योगदान दिलेच परंतु सर्वसामान्य शेतकऱ्यांनाही वेगवेगळ्या सवलती देऊन भारतासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या विचारातून आजचे नेते काहीतरी प्रेरणा घेणार आहे की नाही ? यासाठी मतदारांनी कर्तव्यदक्ष उमेद्वारास मतदान करावे.

मत या शब्दाचा अर्थ म्हणजेच प्रत्येक

व्यक्तीच्या मनातील भावना विचार वा ध्येय असे अनेक अर्थ या शब्दातून निघतात. प्रत्येक व्यक्ती हा जन्माला आला म्हणजेच तो देशातील त्यांचे कर्तव्य पार पाडतच असतो. तर समाजामध्ये देशातील प्रत्येक नागरिकांना आपले मतदान करण्याचा अधिकार त्याला प्राप्त होतो. प्रत्येकजण हा आपल्या भावना, आचार, विचार या गोष्टी एकत्र आणून आपले मत व्यक्त करत असतो. मतदान करण्याचा सर्वांना अधिकार आहे. राष्ट्रपतींनासुध्दा मतदान करण्याचा अधिकार आहे. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीच्या इच्छेवर मतदान अवलंबून असते. या स्वातंत्र्याचा उपभोग घेणे हे प्रत्येक नागरिकाने आपला विकास साधणे असे गृहित धरले पाहिजे.

देशातील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क आहे. व त्याने हे कर्तव्य बजावलेच पाहिजे. कारण प्रत्येक व्यक्तिला जीवन जगण्यासाठी, आनंदी राहण्यासाठी, समानतेसाठी, स्थलांतरासाठी इतरांना बोलावण्यासाठी अधिकार प्राप्त झाले असल्यामुळे प्रत्येकाने मतदान करणे हे आद्य कर्तव्य असते. प्रत्येक व्यक्ती आपले हक्क व अधिकार शासनासमोर मांडू शकतो. त्यासाठी आपण मतदान हे योग्य व्यक्तिला केले पाहिजे. मतदान करण्यासाठी काही वयोमर्यादा ठरविली आहे. पूर्वी मतदान करण्यासाठी २१ वर्षे वयाची अट होती परंतु काही कालावधीत काँग्रेस पक्षातील नेत्यांना या वयामधील उणिवा ध्यानात आल्याने त्यांनी १८ वर्षे ही वयाची अट निर्धारित केली. जेव्हा व्यक्तिच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होतील तेव्हाच त्या व्यक्तिला मतदान करता येऊ शकते.

मतदान कसे करावे ? कोणाला करावे ? मतदानाचा हेतू काय ? हे समजण्यासाठी प्रत्येक व्यक्तिला वैचारिक बुध्दीची आवश्यकता असते. ती व्यक्ती सज्ञान झालेली असावी. म्हणजे तो आपले विचार, भावना व भविष्याचा विचार करून आपले मत योग्य प्रकारे मतदान करू शकतो. मतदान हे श्रेष्ठ तेव्हा ठरते जेव्हा योग्य व जनहितवादी उमेदवारांनाचा मतदान होते परंतु या दानाचा पवित्र हक्क आपण योग्य नेता निवडून बजावतो का ? की आपण मतदान करण्यासाठी बाहेरच पडत नाही ? माझं ठिक चाललंय किंवा मी मतदान न करण्याने काय फरक पडणार आहे ? असा विचार आपण सर्वजणच करतो. त्याचे परिणाम आज दिसत आहे. सुशिक्षित, विचारी माणसे मतदानाला न गेल्याने अयोग्य नेतेमंडळी याचा गैरफायदा घेऊन हे पवित्र दान गरिबांकडून कोणत्याही मार्गाने आमिष दाखवून, खोटे बोलून, वा पैसे देऊन स्वतःच्या पारड्यात मते घेतात व देशाचे राज्यकर्ते बनतात. त्याची झळ किंवा परिणाम आपल्याला जाणवल्यावर आपण फक्त जळफळत बसतो व तो अन्याय मुकाटपणे सहन करतो. तरीसुध्दा मतदान करावे असे आपणाला वाटत नाही.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी आपले बलिदान दिले, सुखसमृध्दी लाथाडून घरादारावर नांगर फिरवला व देशात सर्वांना समान अधिकार, हक्क देणारी लोकशाही अस्तित्वात आणली. प्रत्येक नागरिकाला, त्यांचे वय, शिक्षण, श्रीमंती, गरिबी, जात, धर्म उच्च-नीच, लिंग विचारात न घेता मताचे दान करण्याचा पवित्र हक्क बहाल केला आहे. त्यांचा हेतू किती उदात्त, मानवतावादी असेल याची कल्पना जरी केली तरी आपण मतदान करावे व ते योग्य व्यक्तीलाच करावे असे मनापासून वाटेल. तो आपण प्रत्यक्षात उतरवण्याचा निर्धार करु !

या आणि याच सत्पात्री विचारातून मतदान देण्याच्या दिवसाची भारतीय लोकशाही व स्वातंत्र्यासाठी हुतात्मा झालेले या भारत मातेचे सुपूत्र वाट पाहत आहेत. ज्या दिवशी आपण सर्वजण असा विचार करूया की, मतदान हे पवित्र दान आहे. त्याची पवित्रता राखून मतदान केल्याशिवाय राहणार नाही. तसेच माझ्या बरोबरच इतरांनाही मतदानासाठी प्रवृत्त करु ! त्यावेळेसच ते दान सत्पात्री होऊन सामाजिक बांधिलकी असणाऱ्या व्यक्ती निवडून येतील व या देशावर राज्य करतील. देशातील

सर्वसामान्य जनताही स्वाभिमानाने जीवन जगेल व खरा मानवतावादी देश मानला जाईल. कोणतीही व्यक्ती मोठी नाही, लहान नाही सर्वजण या देशाच्या प्रगतीसाठी व प्रतिष्ठेसाठी झटतील. सर्वांनाच पोटभर अन्न व हाताला काम मिळेल. सर्वांना चांगले शिक्षण आरोग्य व पुढे जाण्याचा संधी मिळेल आणि त्यावेळेसच आपण लोकशाहीला मतदान केलल्या अभिमान वाटेल ! कोणाच्याही दोन पैशाला मतदान करताना हात लावू नका ! दारुच्या बाटलीला स्पर्श करू नका ! स्वाभिमान जागृत ठेवा ! पारदर्शक पध्दतीने मतदान करा ! आपण सर्वजण आपला मतदानाचा हक्क बजावून सत्पात्री, मतदान करूया! त्यातूनच स्वतःची व देशाची प्रगती करूया!

**– प्रा. पुनम एन. खरड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# आजची स्त्री

एवढ्याशा आयुष्यात खूप काही हवं असतं पण हवं असतं तेच मिळत नसतं. हवं तेच तेच मिळालं तरी खूप काही कमी असतं. चांदण्यांनी भरून सुद्धाआपलं आभाळ रिकामं असतं.

गौतम बुद्धांनी स्त्रीमुक्तीचे पहिले पाऊल उचलले. तिच्याकडे मानवतावादी दृष्टिकोनातून एक मानव म्हणून बघितले. एकोणिसाव्या शतकात क्रांतीवीर ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री मुक्तीसाठी आशेचा किरण दाखविला. पुढे 'न स्त्री स्वातंत्र्यम अर्हति' या मनूच्या वचनाला हिंदू कोड बिलात मूठमाती देणारे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज व्यवस्थेत स्त्रियांना समानतेने वागविले जात नाही व त्यांना अधिकार मिळावे यासाठी घटनेच्या मुलभूत अधिकारात समानतेचे अधिकार दिले.

आजची स्त्री हि शिक्षणाच्या प्रभावाने धीट झाली. चार भिंती ओलांडून घराबाहेर पडली. आर्थिक बाबतीत अधिक स्वावलंबी झाली.स्त्री या शब्दात असणारी शक्ती, निर्भीडता, आत्मविश्वास तिच्यात आला. स्त्री शिक्षित झाली तरच ती अन्यायाविरुद्ध लढू शकते. शिक्षणामुळे आचार विचारात प्रचंड परिवर्तन घडून येते. विचारांमध्ये क्रांती येते असं म्हटलं जातं. पण जर आजची शिकलेली सुदृढ सक्षम आईच आपल्या मुलीला अंतरिक्षात कल्पना चावला सारखी झेप घ्यायला शिकवण्याऐवजी 'वडाला फेरे मारा' असे शिकवत असेल तर काय म्हणावे? स्त्रियांनी आतापर्यंतच्या प्रवासात नेमके काय मिळविले आणि काय गमावले? काय बदल झाले आणि काय बदल व्हायला हवेत याचा विचार करायला पाहिजे. सासू आणि सून यांच्या नात्यात आता तरी बदल हवेत का?

सासू व सून या नात्याला सुरुवातीपासूनच थोडी काळी किनार आहे. पूर्वीपासूनच हे नातं दूषित झालं आहे. म्हणूनच चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे हि म्हण प्रचलित झाली. एक टक्का अपवाद वगळता नव्वद टक्के सासू या कधी सुनेची होऊ शकत नाही. सासू आणि सूनेचे नाते हे तर आई आणि मुलीप्रमाणे असायला हवे; पण असे होणे म्हणजे दिव्या स्वप्नच म्हणावे लागेल. खरंतर सासू आणि सून हे एकाच व्यक्तीवर प्रेम करणारे दोन जीव, पण का कोणास ठाऊक हे दोन जीव एकमेकांना इतक्या दुराव्याने का पाहतात ? शेवटी दोघींना एकाच घरात राहायचे असते. शिवाय हे नाते तुटणारे ही नसतेच ना. मग उगाच गैरसमजांचे डोंगर उभारून नात्यात दुरावा निर्माण करुन एकमेकांना दुःख देत बसण्यात काय अर्थ आहे? अजून तरी वेळ गेलेली नाहीये. आपण स्वतःला सांभाळूया, सासू सुनेने माय लेकीप्रमाणे वागावे.

**हुंडा पद्धती :**

मानव जातीला लागलेल्या कलंकापैकी हृदयाला पिळ पाडणारा कलंक म्हणजे हुंडा पद्धती. हुंडाबळीमध्ये स्त्रीच- स्त्रीची शत्रू आहे याची प्रचिती आल्यावाचून राहत नाही. केवळ स्त्रीजन्म घेतला म्हणून हुंड्याच्या स्वरुपात यांना दंड द्यायचा का? एखादा पिता आपली मुलगी दान करतो म्हणजे एखादी भेटवस्तू असल्याप्रमाणे दान करणे म्हणजे स्त्रिच्या मनुष्यत्वाचा अपमान करण्यासारखे नाही का? तसेच लग्न कार्यात हुंडा घेऊन अप्रत्यक्षपणे आपली बायको सांभाळण्यासाठी सासऱ्याकडून पैसे घेतो म्हणजे तो स्वतःची पत्नी सांभाळु शकत नाही असा अर्थ होतो. मग अशा व्यक्तिला आपला पती मानायचे का? अशा मुलाशी लग्न करायचे का? याचा विचार प्रत्येक स्त्रीने करायला हवा.

**स्त्रीभ्रूण हत्या :**

स्त्रीभ्रूण हत्या नको म्हणणारे घरात मात्र मुलगाच पाहिजे; मुलगी नको असा आग्रह धरतात. खरं तर पुरुष प्रधान संस्कृतीचा प्रारंभ प्रत्येक कुटुंबात आईपासून होतो. मुलगा वंशाचा दिवा आणि मुलगी परक्याचे धन ही धारणा निर्माण केली जाते. त्यामुळे त्याचा पुरुषप्रधान विचार घट्ट होतो. तो पुरुषप्रधान संस्कृतीचा वाहक बनतो आणि हे चक्र अव्याहत सुरु होते पण हा आग्रह मोडून काढायला नको का? किंबहुना त्यासाठी स्त्रियांनी प्रयत्न करायला नको का? कारण सुनेला पण भारतीय संस्कृतीचे अनेक आदर्श, नैतिक मूल्य यांचा चाललेला ऱ्हास तसेच वंशाचा दिवा, मुलगा पाहिजे हा सासररूपी स्त्रीचाच मुख्य अट्टाहास कोठेतरी थांबायला नको का? कारण मुलगा हवा असा आग्रह धरणारी सासू हि एक स्त्रीच आहे हे विसरून चालणार नाही.

**समाजकारण आणि राजकारण :**

स्त्रीमुक्तीच्या नावाखाली आजकाल बरीच महिला मंडळे निर्माण झाली. पण मुळात स्त्रीमुक्ती म्हणजे 'स्त्रीची मुक्ती'. पण कशातून गुलामगिरीतून? अत्याचारातून? गरिबीतून? लाचारीतून? दुबळेपणापासून की पुरुषांच्या मक्तेदारीतून? का तिने स्वतःला बांधलेल्या बंधनातून? हेच अजून अनेक स्त्रियांना कळले नाही. आजकाल महिलाही भाषणे देऊ लागल्या. पण या महिलांचे कार्य सावित्रीबाई इतके क्रांतिकारी नाही. आपला मेकअप बिघडणार नाही अशा पद्धतीने सामाजिक कार्य चालू ठेवतात. बाबासाहेबांनी संविधानामार्फत ५० टक्के आरक्षण दिले आहे. पण याचा त्या फायदा करून घेतात का? जसं एकोणिसाव्या शतकात चुलीवर काय शिजवायचं हे घरातील कर्ता पुरुष ठरवत असे. अगदी तशीच स्थिती महिलांना मिळालेल्या पन्नास टक्के आरक्षणाच्या बाबतीत होईल का? खरंच ते स्वतः च्या इच्छेने राजकारण करतात की पतीच्या इच्छेने? त्या स्त्रियांवरील अन्याय अत्याचार यांच्या विरोधात तसेच महिलांच्या दैनंदिन समस्या सोडवण्यात यशस्वी होतील का?

**रूढी परंपरा आणि स्त्रियांची भूमिका :**

आपली अवस्था 'कळतं पण वळत नाही' अशी झाली आहे. नवरा आंधळा होता पण आयुष्यभर डोळ्यावर पट्टी बांधणारी गांधारी त्यांना नको होती, तर पतीच्या अज्ञानावर आपल्या डोळसपणाने त्यालाही दृष्टी मिळवून देणारी नवी गांधारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत होती. स्त्रियांनी न्याय संपादन करून एक नवा आदर्श निर्माण केला पण काही स्त्रियांची अवस्था मात्र वेगळी आहे. आजही महिला बऱ्याच अनिष्ट रूढी प्रथा व परंपरा यांमध्ये गुरफटून चालल्या आहेत. हे सर्व आपल्या बुद्धीला पटते का? अहो ज्या रूढी परंपरा यामुळे आपला घात झाला

आपल्याला माणूस असूनही माणसाप्रमाणे वागणूक मिळत नव्हती. मग तीच व्यवस्था परत रुजवण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहात? का करतो आपण हे अनुकरण? आपण काय करत आहोत याचा विचार आपण करायला नको का?

फक्त उपदेश करायचा पण स्वतःला ते आचरणात आणताना मात्र टाळाटाळ करायची. जर आजची स्त्री ही दशा आहे तर मग दिशा काय असेल? हा वर्तमान कोठेतरी बदलायला हवा म्हणून या सर्व समस्यावर एकच उपाय म्हणजे आपण स्त्रियांनी बदलायला हवे. आपण बदललो तर परिस्थिती नक्कीच बदलेल. तेव्हाच खऱ्या अर्थाने भारतीय स्त्री समाजाच्या प्रगतीचा मार्ग बदलेल.

**– तेजस्विनी प्रकाश पवार**
एफ.वाय.बी.सीसएस.

## सुशिक्षितांची अंधश्रद्धा

निवडणुकीला उभे असलेले एक सुशिक्षित पुढारी सांगत होते. गेल्या दोन निवडणुकांमध्ये मला पराभव पत्करावा लागला. माझे ग्रह बिघडलेले होते. पण यावेळी मात्र कुंडलीतील समर्थ ग्रह मला निश्चित विजय मिळवून देणार असं जागतिक कीर्तीचे ज्योतिषाचार्य यांनी म्हटले आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणे दररोज होमहवन चालू आहे. यदा कदाचित हे पुढारी विजयी झाले तर होम हवनामुळे यशस्वी झालो असा त्यांचा दृढ विश्वास वाढेल हे एक उदाहरण.

त्याचप्रमाणे परदेश प्रवास करून आलेले विज्ञानशास्त्राचे एक प्राध्यापक वार्ताहारांना मुलाखत देताना म्हणाले, माझा विदेश दौरा अत्यंत यशस्वी झाला. वैज्ञानिक प्रगतीवरच देशाचा उत्कर्ष अवलंबून असतो. म्हणून विज्ञाननिष्ठा ही आपली जीवननिष्ठा बनली पाहिजे. एका वार्ताहराने आपला प्रवास निर्विघ्नपणे पार पडला ना? अशी विचारणा केली. त्यावर प्राध्यापक म्हणाले, कोणतेही विघ्न आले नाही. हजारो मैलाचा हा दीर्घ प्रवास स्वामीजींच्या कृपेने सुरक्षित झाला. त्यांनी एक मंतरलेला ताईत दिला होता. त्यांच्या प्रभावामुळे सारं ठीक झालं. असो तर मुख्य मुद्दा असा की, वैज्ञानिक दृष्टी ही मानवी प्रगती यांचा परस्पर संबंध घनिष्ठ आहे हेच मी परिषदेत वाचलेल्या निबंधाचे मुख्य सूत्र आहे.

प्राध्यापक महाशयांची ही मुलाखत वाचून हसावे की रडावे हेच मला कळेना. मंतरलेल्या ताईतामुळे प्रवास सुरक्षित होऊ शकत असेल तर मग विज्ञानाच्या प्रगतीची काय आवश्यकता? स्वामीजींनी दिलेला ताईत हाच आपला रक्षणकर्ता आहे ही अंधश्रद्धा त्यांच्या डोक्यात खोलवर गेली आहे. ते विज्ञानाची कशी उपासना करू शकतील? आम्ही आजपर्यंत भोळ्याभाबड्या अडाणी लोकांच्या अंधश्रद्धांना हसत होतो. बोकड बळी दिला की, दैवत प्रसन्न होते किंवा कोंबडे उतरून टाकले की रोग बारा होतो. या प्रकारच्या अनेक गैरसमजुती अजूनही समाजात दृढ आहेत. शास्त्रीयदृष्टीच्या प्रकाशात श्रध्दा बळकट ठरते. अंधश्रद्धांची समाजमनात खोलवर गेलेली ही हरळी कितीही उपटण्याचा प्रयत्न केला तरी तिची मुळे तग धरून राहतात. अशिक्षितांना का हसायचे? सुशिक्षीत ज्ञानसंपन्न म्हणवणारी विद्वान माणसेसुद्धा काही अंधश्रद्धांना कवटाळून असतात. त्यांच्या वागण्याचा आणि बोलण्याचा परिणाम

सामान्य लोकांवर होत असतो. ज्ञानी मनुष्य जेव्हा आकड्यांवर विश्वास ठेवतो. अशास्त्रीय गोष्टींचे समर्थन करतो. तेव्हा कळत नकळत साधारण मनुष्य त्याचे अनुकरण करत असतो.

उदा: एक गृहस्थ सल्ला विचारण्यासाठी आले. त्यांच्या पदवीधर मुलाला नोकरी मिळत नव्हती. बराच प्रयत्न करून ते निराश झाले होते. कोणीतरी संन्याशाने राम हा शब्द लाख वेळा लिहिला तर त्याला नोकरी मिळू शकेल असे सुचविले. मी म्हणालो लक्षवेळा रामनाम लिहिण्यामुळे तुमच्या मुलाचे अक्षर सुधारेल नोकरी कशी मिळेल? 'राम हे प्रयत्नांचे पुरुषार्थाचे श्रेष्ठ प्रतिक आहे. सैन्य जमवून व सेतू उभारून रामाने लवकर झेप घेतली. रावणाला पराभूत केले. न्यायाची ध्वज उभारली. पण हे सर्व अथक प्रयत्नांचे फळ आहे. राम नाम लिहिणे याचा अर्थ प्रयत्नवादी बनले पाहिजे. केवळ अक्षरे गिरवण्याने काय होणार आहे ?

"पंडित म्हणता थोर सुख ।
परि तो पाहता अवघा मूर्ख
काय करावे घोकिले । वेद पठण वाया गेले ।।"

शास्त्र शिकताना त्याचे पठण करावे हे ठिक आहे. पण शास्त्रीय दृष्टीलाच पारखे झालेले शास्त्राभ्यासक इतरांना मार्ग दाखवू शकत नाहीत. उलट त्यांची स्वतःची वाट भ्रमिष्ट कल्पनांच्या धुक्यात हरवून जाते. खऱ्या धार्मिकतेला आणि ईश्वरी भक्तिला कोणाचाच विरोध असण्याचे कारण नाही.आपल्या मनात एखादे तरी चिमुकले घरटे असायला हरकत नाही. वैराण आयुष्याला श्रद्धेचा ओलावा मिळाला तर त्याचे प्रसन्न हिरवळीत रुपांतर होऊ शकते यात शंका नाही. माझा परमेश्वर माझ्या कर्तव्यात सामावला आहे. या श्रद्धेने कर्म करणारा माणूस एक आगळे समाधान मिळवू शकतो.

महात्मा गांधी म्हणाले होते, "मानवतेच्या सेवेत मला तो ईश्वर दिसतो. तो आकाशात नाही किंवा पाताळात नाही. पण प्रत्येक माणसात तो मिसळून गेला आहे." श्रद्धेचे हे एक नितांत सुंदर रूप नव्हे काय? या प्रकारची श्रद्धा मनुष्याला उत्साह देते. त्याच्या थकलेल्या अंगात नविन चैतन्य निर्माण करते. माझ्या बालपणापासून माझा देश स्वातंत्र्य होणार असे म्हणून फासाच्या फळीवर चढलेले हुतात्मे समाधानाने मरणाला सामोरे जातात. श्रद्धेतूनच प्रेम, सौंदर्य व शक्ति या गोष्टी उदयाला येतात. पण काही झाले तरी श्रद्धा ही ज्ञानातूनच आविष्कृत झाली पाहिजे. तिला वैचारिक बैठक नसेल तर तिचे रुपांतर अंधश्रद्धेत झाल्याशिवाय राहत नाही. खुळचट,क्षममुलक,अंधश्रद्धांचा आजच्या वैज्ञानिक जगातसुद्धा सुळसुळाट झालेला दिसावा यापेक्षा आश्चर्य ते कोणते?

नदीच्या पाण्यात उतरून काही मंत्र पुटपुटत आकाशाच्या दिशेने पाणी फेकणाऱ्या एक श्रद्धाळू माणसाला धर्मसुधारकाने एक प्रश्न विचारला तू हे काय करतोस? या कृतीचा अर्थ काय? तो भाविक म्हणाला, माझ्या स्वर्गस्थ पितरांना मी हे पवित्र जल अर्पित करत आहे. माझे पितर त्यामुळे तृप्त होतील. तो धर्मसुधारकही ओंजळीत पाणी घेऊन किनाऱ्याकडे फेकू लागला. यात कसला शहाणपणा आहे.? बारा मैलावरच्या शेताला येथून पाणी देणारा तुझ्यासारखा वेडा मी प्रथमच पाहत आहे. हे पाणी कधीतरी पोहोचणं शक्य आहे का? शक्या शक्यतेचा नीट विचार करूनच कोणतीही कृती करावी. आता तो धर्मसुधारक हसून म्हणाला, न दिसणाऱ्या स्वर्गातल्या पितरांना तू पाणी देऊ शकतो. ते त्यांना मिळत आहे तर मग बारा मैलांवरती शेतापर्यंत हे पाणी का पोहचू नये? त्या भाविकाच्या डोक्यात कितपत प्रकाश पडला हे सांगणे खुप कठीण आहे.

श्रद्धा माणसाचे मानसिक सामर्थ्य वाढवते.

अंधश्रद्धा मात्र त्याची मनशक्ती क्षीण करते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा त्यांच्या सीमारेखा जवळ जवळ आहेत म्हणूनच याचे भान ठेवणे आवश्यक आहे.

**– कल्याणी किनकर**

एफ.वाय.बी.कॉम

# करियरची दिशा

पुढे काय करायचं ? हा प्रश्न मुलांपेक्षा पालकांनाच अधिक पडतो. विशेषतः मुलगा किंवा मुलगी दहावीत गेले की, लगेच त्यांच्या भविष्याबद्दलची चिंता त्यांना सतावू लागते. त्यात अस्वाभाविकपणा काही नाही. पण त्यामुळे मुलांची इच्छा त्यांची आवड किंवा त्याला मिळालेले गुण याकडे दुर्लक्ष होते. विविध विषयांमध्ये मिळालेल्या गुणांवरुन जरी ठामपणे मुलांचा कल किंवा आवड काय आहे हे खात्रीशीररित्या ठरवता येत नसलं तरी हे गुण दिशा निश्चितीसाठी नक्कीच उपयुक्त ठरु शकतात.

**कल क्षमता ओळख**

मुलगा गणित/भौतिकशास्त्र/इंग्रजी या विषयांमध्ये जेमतेम ६०% च्या आसपास कामगिरी करत असल्याचं दिसुनही जर पालक त्याला अभियांत्रिकी शिक्षणाच्या भरीस घालत असतील तर पुढे नैराश्याशिवाय पर्याय उरणार नाही. कारण अभियांत्रिकीच्या जागा शिल्लक राहण्याचं प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत चालले आहे. त्यामुळे सीईटी दिलेल्या व अतिशय कमी गुण मिळविलेल्या उमेदवारालाही अभियांत्रिकीला प्रवेश मिळतो. पण अशा विद्यार्थ्यांचा पाया कच्चा असल्यानं त्याची गाडी एकतर पुढे सरकत नाही आणि सरकली तरी ती ढक्कलगाडी आणि पंक्चर झालेली असते. अशा विद्यार्थ्यांना समजा चार पाच वर्षानंतर पदवी मिळाली तरी ती त्याला टिकवता येणं जवळपास अशक्य आणि प्रगतीच्या संधी तर जवळपास शून्य असतात. दोष मात्र अभियांत्रिकीच्या ज्ञान शाखांना दिला जातो. इतर शाखांबाबतही असच घडत राहतं. त्यामुळे मुलांची आवड/गुणवत्ता/कल, आतापर्यंतची त्यांची शैक्षणिक कामगिरी एकिकडे आणि दुसरीकडे पालकांच्या इच्छा/अपेक्षा/आकांक्षा आणि त्यासाठी वाटेल तेवढा पैसा मोजण्याची मानसिकता यात मुलांच्या करियरची दिशा भरकटू शकते.

**खाजगी शिकवणी वर्गाचा आग्रह**

आई वडीलांच्या इच्छेला बळी पडून मुले दहावीनंतर विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेच्या शिकवणी वर्गांना जाऊ लागतात. त्यांची पहाटेपासून रात्रीपर्यंत सारखी पळापळ सुरु राहते. काही अपवाद सोडल्यास... बहुतेक शिकवणी वर्गामध्ये यांत्रिकी पद्धतीने म्हणजेच अधिकाधिक गुण कसे मिळवता येईल याच पद्धतीवर भर दिला जातो. यामध्ये मुलभूत संकल्पना समजून देण्याच्या किंवा त्या समजावून घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याकडे बहुतेकदा दुर्लक्ष केले जाते. शनिवारी/रविवारी होणाऱ्या परीक्षा आणि त्यात मिळवणारे गुण त्याचं विश्लेषण याचं सध्या मोठच कोडकौतुक घरीदारी होत असते. आपल्या मुलाला चाचणीमध्ये एकदम उत्तम किंवा भरपूर गुण मिळतात असं सांगण्यात पालकांनाही भूषण वाटते. अशा चाचणीमध्ये मिळणारे गुण म्हणजे त्याच्या चांगल्या महाविद्यालयातला प्रवेश जवळपास निश्चित झाल्याचा, भ्रमाचा अंगरखा पांघरला जातो. या अंगरख्यांची रंगरंगोटी करुन पालकांना आणि पाल्याला वास्तवाची फारशी जाणीव होणार नाही. याची बरेचसे शिकवणी चालक खुबीने काळजी

घेतात. प्रत्यक्ष निकाल लागतो तेव्हा इतके विपरीत घडले असते की, त्या धक्क्यातून पालक आणि पाल्यास बाहेर पडण्यास बराच कालावधी जातो. हा धक्का मनात साठवून विद्यार्थ्यांचा पुढचा प्रवास सुरु होतो खरा पण यातून फार कमी विद्यार्थी सावरतात नि प्रगती करतात. इतरांची भटकंती सुरु होते. ती कधी आणि कशी संपेल हे सांगणं कठीण असतं. अशा शिकवणी वर्गातून यंत्रमानवासदृश्य मुलांची निर्मिती होते असे म्हटल्यास वावगे ठरु नये. त्यामुळे परीक्षेच्या निकालानंतर मुलांची स्थिती अवघड होते. अर्थात हे सगळ्यांच्या बाबतीत होते असे नव्हे परंतु बहुतांश विद्यार्थ्यांच्या बाबतीत होताना दिसते.

**एककलमी रेटा**

परीक्षेत अधिकाधिक गुण मिळविण्याच्या एककलमी रेट्यामुळे विद्यार्थ्यांना या काळात भाषा कौशल्य, संवाद कौशल्य, गणितीय कौशल्य, सादरीकरण कौशल्य अशा बाबींना साध्य करता येत नाही. याकडे पूर्णतः दुर्लक्ष होते. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवून शंभरातील २५ ते ३० टक्केच मुलं सक्षमरीत्या अभ्यासक्रम पूर्ण करु शकतात. त्यांना करिअरच्या संधी चांगल्या मिळतात. पण त्याच वर्गातील इतर मुलांना मात्र संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष इथे संपत नाही. कारण पुढे विविध स्पर्धा परीक्षेच्या आखाड्यात उतरल्यावर त्या बाबींच्या अभावामुळे या परीक्षाही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होता येत नाही. अशा परीक्षा देण्यात उमेदीची चार-पाच वर्षे निघून जातात. यश काही मिळत नाही. दुय्यम किंवा तृतीय श्रेणीच्या नोकरी किंवा रोजगाराकडे वळावे लागते. या प्रवासात झालेल्या ओढा-ताणीमुळे या मुलांच्या मनात स्वतःविषयी, पालकांविषयी, सामाजिक परिस्थितीविषयी कटुता येण्याचीही शक्यता असते.

**समतोल विचारांची गरज**

अशी ही चौफेर विचित्र स्थिती निर्माण होण्याची शक्यता टाळण्यासाठी पालकांनी समतोल विचार करुनच करिअरची दिशा ठरवायला हवी. १० वी १२ वी पर्यंत विद्यार्थ्यांनाही आपल्या सक्षम बाजू किंवा कमकुवत बाजू निश्चित लक्षात येतातच. त्या लक्षात घेऊन त्यांनीही काही आराखडे मनात ठरवलेले असतात. त्याविषयी त्याच्यासोबत पालकांनी चर्चा करायला हवी. समुपदेशक दिशा दाखवू शकत असेल तरी त्याची पूर्वतयारी ही पालक आणि विद्यार्थ्यांनी घरी प्रामाणिकपणे करायला हवी. पाच-पंचवीस प्रश्न विचारुन आणि त्याच्या गणितीय विश्लेषणानंतर काही निष्कर्ष जर समुपदेशक सांगत असेल तर त्याचा निश्चितच विचार करायला हवा. पण हे निष्कर्ष म्हणजे ब्रम्हास्त्र नव्हे हेही तितकेच खरे. आपल्या मुलाची खरी क्षमता पालकांना जितकी ठाऊक असते; तितकीच ती त्रयस्थाला ठाऊक असते असे समजणे घातक आहे. त्यामुळे समुपदेशनाला जातानासुद्धा आपल्या पाल्याच्या क्षमतेविषयी प्रामाणिक व वस्तुनिष्ठ माहिती समुपदेशकाला द्यायला हवी. शिकवणी वर्गाच्या साप्ताहिक परीक्षेत तर खुपच चांगले गुण मिळत होते किंवा शिकवणी वर्गाच्या ऑल इंडिया परीक्षेमध्ये त्याची रँकिंग पहिल्या पाचशे मध्येच आली होती मात्र परीक्षेत काय झाले ते कळत नाही किंवा परीक्षेच्या नेमक्या दोन दिवस आधी त्याल बरं नव्हते किंवा परीक्षेच्या दिवशी तो फारच घाबरला किंवा अभ्यासक्रमाच्या बाहेरचे प्रश्न आले होते किंवा त्याने तर अचूक सोडविले होते. तपासण्यात काहीतरी गडबड झालेली दिसते अशी पोकळ कारणे सांगणे टाळायला हवीत. कारण यामुळे आपण आपला अहंकार गोंजारत असतो. आपली कमकुवत बाजू किंवा आपल्या चुकांवर पांघरुन टाकण्याचा प्रयत्न असतो. असे सांगणे खोटे समाधान असते. खरं

सांगितल्याने आपली वा मुलाची प्रतिष्ठा काही कमी होत नाही. कुणालाही त्याच्याशी घेणं - देणं नसते. तेव्हा घरी आणि समुपदेशकाकडे किंवा आणखी कुणाकडेही मार्गदर्शन घेण्यासाठी जायचे असल्यास प्रामाणिक व पारदर्शक माहिती देणे आवश्यक ठरते.

प्रामाणिक विचारमंथनातूनच मुलांच्या मनात काय चालले आहे ही माहिती काढता येऊ शकते. मानसशास्त्रीयदृष्ट्या आपल्या निर्णयांना कुणाचा तरी पाठींबा हवा असण्याची गरज असते. त्या गरजेचं वर्तुळ आपण आपल्या सोयीनुसार काढू इच्छितो. ते टाळायला हवं. मुलाची इच्छा डॉक्टर वा इंजिनियर बनण्याची नसेलच तर त्यासाठी इतरांच्या मान्यता व पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न हा अंतिम केविलवाणा ठरु शकतो. त्यामुळे त्या वाटेने जाऊ नये. गणितात हुशार असुनही एखाद्या मुलाची अर्थशास्त्राची अभ्यास करण्याची इच्छा असेल तर त्याला नक्कीच प्रोत्साहन दिलं पाहिजे. अशी मुलं पुढे मोठा पल्ला गाठतात. अशांना एकतर अपयश येत नाही. समजा आले तर ते स्वतःच त्यातून मार्गही काढतात. किंबहुना चांगल्या पर्यायांचा शोध ते स्वतःच घेऊन ठेवतात. स्वतःच्या निर्णयाची जबाबदारी घेण्याचा प्रामाणिकपणा अशांकडे असतो. महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान शाखेतील सर्व प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम.वराट यांच्या मार्गदर्शनाखाली अविरत परिश्रम घेत असतात.

**- प्रा. के. बी. ताके**
वाणिज्य विभाग प्रमुख

# आजच्या काळातील गणेश उत्सवाचे स्वरूप

उत्सव, उत्साह आणि आनंद हे एकमेकांच्या हातात हात घालून येतात. जेव्हा गाव पातळीवर हे उत्सव साजरे व्हायचे. तेव्हा त्या गावातील लहान मोठयांचा सक्रीय सहभाग असायचा. परंतु आयुष्यात आलेली गतिमानता,पैशांच्या गणिताची विषमता, बदललेली राजकीय परिस्थिती, लोकांची मानसिक जडण घडण या सर्वांमुळे उत्सवांचे नुसते स्वरूपच नाही तर त्यामागील उद्देश सुद्धा बदलले आहेत. महाराष्ट्रात गोकुळाष्टमी, होळी,नवरात्री, गणपती, दसरा-दिवाळी हे मोठया प्रमाणात व सार्वजनिक स्वरूपात साजरे केले जातात.

“देव येतोय माझा...
आस लागली तुझ्या दर्शनाची
तुला डोळे भरून पाहण्याची
कधी उजाडेल ती सोनेरी पहाट
गणराया तुझ्या आगमनाची...”

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातला सर्वांचा आवडता व मोठा उत्सव.पूर्वी हा उत्सव धार्मिक स्वरुपात साजरा होत असे. अथर्वशीर्षाची आवर्तने, पूजा, मंत्रजागर, संध्याकाळी आरत्या असे त्याचे स्वरूप होते. त्यामुळे कोठेही गैरवर्तन करायला माणसे धजवायची नाहीत. लोकमान्य टिळकांनी देव्हाऱ्यातील गणपती चौकात आणला आणि सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात झाली. समाजप्रबोधन हा त्यांचा मूळ व मुख्य हेतू होता. तो आता कुठेच दिसत नाही! आता दिसते ते म्हणजे मोठमोठ्या मूर्तींच्या सजावटीसाठी - १० दिवसांसाठी भर रस्त्यात मांडव घालून मूर्ती विसर्जनानंतरही

कित्येक दिवस न काढणे असे त्रासदायक प्रकार. या उत्सवात राजकारण्यांचा हात असेल तर अवघड जागी दुखणे. या शिवाय मूर्ती प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या असल्यामुळे त्या पाण्यात विरघळत नाहीत. दुसऱ्या दिवशी विसर्जनस्थळी बघावे तर कुजलेल्या निर्माल्याची सगळीकडे घाण व दुर्गंधी पसरलेली दिसते. १० दिवसांपर्यंत ज्या गणपतीचे आपण इतके लाड करतो पण नंतरची ही दुरावस्था बघवत नाही. परंतु सगळेच जण ही दुरावस्था पाहून गप्प बसत नाहीत. आता खूपशा सामाजिक संस्था व व्यक्ति पुढाकार घेऊन विसर्जनाची उत्तम व्यवस्था करतात. त्यासाठी कृत्रिम हौदांची सोय, निर्माल्य स्वरूपातच गोळा करून त्याचे खत तयार करणे, लोकजागृतीसाठी व्याख्याने व चित्र प्रदर्शने भरवणे, मार्गदर्शक पोस्टर्स लावणे अशा गोष्टी जाणीवपूर्वक करतात. विसर्जन स्वच्छ व शिस्तबद्ध व्हावे म्हणून कॉलेजमधील मुले स्वयंसेवक म्हणून काम करतात. थर्मोकोलच्या ऐवजी 'इको-फ्रेंडली' मखर करण्यासाठी लोकांना सांगितले जाते. तसेच एक गाव एक गणपती संकल्पनाही लोकांना पटायला लागली आहे.

लालबागच्या गणपती समोर भाविक इतके पैसे, सोने-नाणे ठेवतात की करोडोंची संपत्ती जमा होते. पण एखाद्या हॉस्पिटलला किंवा शाळेसाठी लोकांना देणग्या द्या म्हटले तर ती लोक देणार नाहीत. समाजातील वाढते तणाव लोकांना अंधश्रद्धेकडे नेत आहेत. 'भक्तीपेक्षा सक्ती व शक्ती मोठी झाली आहे. आमची अमेरिकेत राहणारी मुले गणपती उत्सव तिथेसुद्धा साजरा करतात. पण इथल्यासारखा बाजारूपणा तिथे नाही व पर्यावरणाची शिस्त तर त्यांना पाळावीच लागते.

सणांचे 'अर्थकारण' हा एक अतिशय महत्त्वाचा विषय आहे. आजच्या पिढीजवळ पैसा आहे पण वेळ नाही. त्याचा परिणाम म्हणून या दिवसात नेहमीच्या वस्तुंचे भाव जबरदस्त वाढतात. अगदी जास्वंदीचे फुल १० रु, कणीस २० रु, आणि तरी ते खपतात!! यामध्ये दिसते ती श्रद्धा? भक्ती? की मनातील विचारसरणीत अडकलेले विचार? की मनातील भीती? हे समजत नाही.

सण उत्सव कालच्या पद्धतीने साजरे केले किंवा आजच्या पद्धतीने तरी त्यातील आनंद प्रत्येक जण घेतच असतो. संस्कृतीचा प्रवाह वाहता ठेवण्याचे कार्य हे उत्सव करत असतात. म्हणूनच ते कधी थांबत नाहीत. आजोबांकडून नातवाकडे हा प्रवाह चालू राहतो. हिच आपल्या देशाची ओळख आहे. देशाचे राजकारण, समाजकारण, अर्थकारण यामुळे उत्सवाचे सादरीकरणाचे प्रकार बदलतात पण म्हणुन उत्सवांचे महत्त्व कमी होत नाही. तरी मला या देशातील नागरिकांना सांगावेसे वाटते की, हे उत्सव साजरे करताना पर्यावरण, पैशाचा अपव्यय, अंधश्रद्धा, घातपात या सगळ्यांचा विचार करा. उत्सवांचा निरंतर आनंद घ्या व तो सर्वांना वाटावा हिच मनोमन सदिच्छा...

**– दिपाली दिलीप कराळे**

एस.वाय.बी.सी.एस.

# सहवास

खरंच! किती सहज आपण सहवास हा शब्द वापरतो परंतु कधी त्याचा खोलवर विचार केला आहे का? सहवासाला आपल्या आयुष्यात किती महत्त्व आहे. मित्रांचा-मैत्रिणींचा जसा सहवास मिळेल तसे जीवनाला वळण लागते. मित्र -मैत्रिणी चांगले

असतील तर जीवन त्या दिशेने बदलते. आई वडिलांचा सहवास जसा असेल तसे संस्कार जीवनाला घडतात.

गुरुजनांच्या सहवासाने जीवनाला योग्य मार्ग सापडतो. पूर्वीची मुले एकत्र कुटुंब पध्दतीत असल्यामुळे आजी, आजोबा, काका, काकू यांच्या सहवासात जास्त राहत असत. त्यात काळानुरूप बदल होत गेला. एकत्र कुटुंबाची जागा स्वतंत्र कुटुंबाने घेतली. आई वडिल दोघेही नोकरी करू लागली. पर्यायाने मुलांना पाळणा घराचा मार्ग निवडला गेला. तो मार्ग कमी पडला की काय म्हणून मुले अडीच ते तीन वर्षातच शाळेत जाऊ लागली. त्यात ज्युनियर के.जी, सिनियर के.जी असा मुलांना घरातून बाहेर गुंतविण्याचा पर्याय निघाला. त्यामुळे आपोआपच मुले घरातून जास्त वेळ बाहेर राहू लागली. त्यांना पालकांचा कमी व बाहेरचा सहवास जास्त मिळाला. त्यामुळे मुले एकलकोंडी बनत चालली आहेत.

त्यामुळेच त्यांना बाहेरचे जग आवडू लागले. जास्त वेळ बाहेर राहिल्यामुळे नात्याचा अर्थ त्यांच्या आयुष्यातून वजा झाला. मनाला वाटेल तसे वागणे यालाच ते स्वातंत्र्य म्हणू लागले. त्या स्वातंत्र्याचाच परिणाम म्हणून आईवडिलांना त्यांनी वृद्धाश्रमाचा मार्ग दाखविला. शेवटी मला येथे एक सांगावेसे वाटते,

''पाण्याचा एक थेंब गरम तव्यावर पडला तर त्याचे अस्तित्व संपते.

मातीत पडला तर त्याचा चिखल होतो.

तोच थेंब कमळाच्या पानवर पडला तर मोत्यासारखा चमकतो.

आणि तो शिंपल्यात पडला तर साक्षात मोतीच होतो.

पाण्याचा थेंब तोच फरक फक्त सहवासाचा''

यावरून प्रत्येक व्यक्तिने स्वतः ठरविले पाहिजे की, सहवास कोणाचा करावा. यातच त्याचा जीवनमार्ग दडलेला आहे.

**– सुरेखा गिऱ्हे**
टी.वाय.बी.ए.

# स्वच्छ भारत अभियान

स्वातंत्र्य लढ्यामध्ये गांधीजीनी जसे QUIT INDIA असे सांगितले तसेच सर्व भारतवासीयांना CLEAN INDIA चा पण मंत्र दिला होता. ते मंतरलेले दिवस होते. गांधीजी म्हणतील ते जनता मनापासून करीत होती. गांधीजी स्वतः हातात झाडू घेऊन आश्रम झाडीत होते आणि त्यांच्याबरोबर मोठे नेते, गरीब, श्रीमंत, लहानथोर, तसेच परदेशी स्वयंसेवक सुद्धा हातात झाडू घेऊन स्वच्छता करिता होते. तसेच मंतरलेले दिवस आता आले आहेत. सर्व भारतभर एकच जयघोष चालू आहे तो म्हणजे 'एक कदम स्वच्छता की ओर' आणि 'क्लीन इंडिया ग्रीन इंडिया.' विद्यालये, महाविद्यालये, NGO, मान्यवर व्यक्ती, रेडिओ, टीव्ही सर्वांना गांधीजींचे स्वप्न पुरे करावयाचे आहे. त्यासाठी सर्वजण झटून कामाला लागले आहेत. असे अचानक घडते आहे का?

इ.स. १९९१ पासून ह्या गोष्टीकडे सरकारचे लक्ष गेले होते. लोकांना स्वच्छतेचे महत्त्व जाणवून दिले पाहिजे हे ध्यानात आले. पर्यटनाच्यादृष्टीने भारत हा देश सर्व पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे. भारतासारखी विविधता, निसर्ग सौंदर्य, पुरातन वास्तू ह्या सर्वांचे त्यांना आकर्षण आहे. पण अस्वच्छता आणि घाण कुणालाच आवडत नाही. त्यांच्या टीका ऐकून आपली मान शरमेने खाली जाते. पण सांगणार कोणाला? त्यासाठी जनमाणसात जागर झाला पाहिजे. इ.स. १९९९ मध्ये निर्मल भारत अभियान ह्याचा उदय झाला. त्याला म्हणावा तसा प्रतिसाद

मिळाला नाही. मग २० सप्टेंबर २०१४ मध्ये स्वच्छ भारतची मुहूर्तमेंढ रचली गेली आणि सुरु झाली एक भारतभर जागृती. संख्यात्मक विश्लेषण केले गेले. किती गावे शौचालयाविना आहेत, त्याचा सर्व्हे केला गेला आणि एक धक्कादायक सत्य बाहेर आले. वाचून तुम्हाला धक्का बसेल पण भारतात एकंदरीत ११०४ करोड परिवार शौचालायाविना आहेत. २.१५ लाख सार्वजनिक शौचालयाची गरज आहे.

भारतात एकूण ४४०१ गावांमध्ये शौचालय नाहीत. त्यामध्ये स्त्रिया व मुलींची खूप कुचंबणा होते. मुलींना अर्ध्यावर शिक्षण सोडून घरी बसावे लागते. रात्री अंधार पडल्यावरच जाता येते. त्यामध्ये धोका पण असतो. मुंबईसारख्या महानगरात तर यापेक्षा वाईट स्थिती आहे. पोटा पाण्यासाठी अख्ख्या भारतातून लोक मुंबईला येतात. झोपडी बांधून राहतात पण प्रात:विधीसाठी रेल्वेच्या बाजूला किंवा ट्रॅकवर बसतात. गाडीतून जाताना किती घाण वाटत असेल. कोणीही परदेशी लोक आपल्याल्या सलाम डॉग म्हणणार? लोक पानं खातात, तंबाखू खातात आणि रस्त्यावर थुंकतात. भिंतीवर, जिन्यांवर, जुन्या गड किल्ल्यांच्या भिंतीवर थुंकतात. रस्त्यावर घाण टाकतात पण त्याचे त्यांना काहीच विशेष वाटत नाही. असे कसे? कारण लहानपणापासून त्यांना अशीच सवय लागलेली असते. बहुसंख्य लोक खेडोपाडी राहतात आणि अजूनही जुन्याच सवयीने वागतात. एवढेच कशाला ? आपणही किती बरोबर वागतो? बागेत, देवालयात, समुद्र किनारी किंवा सार्वजनिक ठिकाणी आपण प्लॅस्टिकच्या बाटल्या, प्लास्टिक पिशव्या, वेफर्स, कुरकुरेची पाकिटे टाकतोच ना? गाडीतून जाताना, रेल्वेतून, खिडकीतून, प्लास्टिक बाटल्या, खाण्याच्या पदार्थाचे कागद, काहीही आपण निर्धास्तपणे टाकतो. ही घाण ट्रॅकवर साचते आणि मग पावसाचे पाणी तुंबते. उंदीर, माशा, डास यांचा प्रार्दुभाव होतो आणि त्यायोगे साथीचे रोग पसरतात. आपणच त्या गोष्टीना निमंत्रण देतो. पण नाही! आता सरकार, नेते, मान्यवर, अगदी सामान्य माणसे देखील खडबडून जागे झाले आहेत. एक कदम स्वच्छता की ओर म्हणत पावलांवर पाऊल टाकीत आहेत. ह्याचाच परिपाक म्हणून स्वच्छता अभियान नावाची मोहीम सुरु झालेली आहे. चला तर मग आपण त्याचा आढावा घेऊ या.

सन २०१९ मध्ये महात्मा गांधीजींची १५० वी जयंती आहे. तोपर्यंत संपूर्ण भारत स्वच्छ करायचा आहे. हि एक नियोजनबध्द योजना आहे. ज्यामध्ये सरकारकडून, टीव्ही, रेडीओ, वर्तमानपत्र, स्पर्धांद्वारे मोठ-मोठ्या व्यक्तींकडून आवाहनाद्वारे सर्वांना जागृत केले जाते. एका कुटुंबाला शौचालय बांधण्यासाठी सरकार १२०००/- रुपये मंजूर करीत आहे. ज्यामध्ये ९००० /- रुपये केंद्र सरकार आणि ३०००/- रुपये राज्य सरकार देत आहेत. तसेच सरकार २.१६ लाख सार्वजनिक शौचालय बांधून देणार आहेत. सर्वजण आपापला हातभार उचलित आहेत. आपण पण काहीतरी करायला हवे ना?

**आपण काय करू शकतो ?**

१. सार्वजनिक ठिकाणी गेल्यावर बाटल्या, खाद्य पदार्थाची पाकिटे व इतर गोष्टी एका बॅगमध्ये जमा करून कचरा कुंडीत टाकावा. जर कुंडी नसेल तर घरी घेऊन आपल्या कचरा कुंडीत टाकावा.

२. ओला आणि सुका कचरा असे निवडून तो कचरा नगरपालिकेच्या कचरा जमा करणाऱ्या गाडीत टाकावा.

३. कोणी रस्त्यावर थुंकत असेल, घाण टाकीत असेल तर त्याला अडवावे.

मग स्वत:पासून सुरुवात करूया, भारत स्वच्छ करूया.

**– प्रविण कृष्णा मोरे**
एस.बाय.बी.कॉम

# मानवी विकास व भाषा शिक्षण

आपला देश बहुभाषी आहे.इथे भाषांच्या विकासाची प्रकिया सतत सुरु आहे. प्रत्येक भाषेचे आपले स्वतःचे नियम आहेत. या नियमानुसार भाषेचा विकास, प्रसार-प्रचार होत असतो. या नियमांना बांधिल राहुनच त्या-त्या भाषेचे अभ्यासक भाषेच्या विकासामध्ये आपले योगदान देत असतात. या विकास प्रक्रियेत प्रसार माध्यमांचा, मुद्रित साहित्याचा मोलाचा वाटा असतो. प्रत्येक भाषेमध्ये अनुवादाची प्रक्रिया सुरु असते. अनुवादाच्या माध्यमातून भाषा भाषांमध्ये साहित्याची देवाण-घेवाणही होत असते. एखादी भाषा अनुवादाच्या माध्यमातूनही समृध्द होऊ शकते. यासाठी अनुवादाचा दर्जा उच्च प्रतीचा हवा. एकुणच भाषा शिक्षण समाजाच्या विकास प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे.

देशातील विविध प्रांतातील भाषांची विकास प्रक्रिया दिवसेंदिवस गुंतागुंतीची बनत चालली आहे. आजही आपल्या शाळा-महाविद्यालयांमधून भाषांच्या अभ्यासक्रमाबद्दल ठोस उपाययोजना होताना दिसत नाही. भाषांचा स्वतंत्र अभ्यास करण्यासाठी प्रयोगशाळा नाहीत. जेथे या प्रयोगशाळा आहेत; त्या ठिकाणी पुरेशी साधन सामग्री नाही. भाषांमधील संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी सर्वसमावेशक अशा भाषा-शिक्षणप्रक्रियेची नितांत गरज आहे.

आपल्या देशात मराठी, हिंदी, मल्याळी, कोकणी, सिंधी, गुजराती, डोगरी, पंजाबी, उर्दू, काश्मिरी, संस्कृत, बोडो, आसामी, नेपाली, मणिपुरी, संथाली, उडिया, बंगाली, मैथिली, तेलगू, कन्नड, तमिळ या प्रमुख भाषांच्या विकास प्रक्रियेवरच आपल्या सामाजिक विकासाचे सूत्र निश्चित होते.त्यामुळे प्राथमिक स्तरापासूनच मुलांना भाषा शिक्षणाचा स्वतंत्र असा सूत्रबद्ध अभ्यास घ्यायला हवा. भाषा शिक्षणाच्या जोरावरच वेगवेगळ्या क्षेत्रातील सत्ताकेंद्रे अनेकांनी आपल्याकडे ठेवली आहेत. शिक्षणाच्या या प्रक्रियेत मातृभाषेला' अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच घ्यायला हवे. या मतावर अनेक शिक्षण तज्ज्ञांचे एकमत आहे; पण वर्तमान स्थिती पाहता पालकांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे. आपले पाल्य मातृभाषेतून शिक्षण घेऊन या स्पर्धेच्या युगात टिकणार नाही अशी भावना पालकांमधून व्यक्त होत आहे. य ा भयावह स्थितीचा विचार व्हायला हवा. मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण असा आग्रह धरायला हवा.

प्रत्येक देशाची आपली स्वतःची भाषानिती असते आणि मुख्य म्हणजे भाषानितीचा देशाच्या विकास प्रक्रियेशी घनिष्ट संबंध असतो. त्यामुळे भाषा शिक्षणामध्ये होणाऱ्या संशोधनाला आज विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आपला देश बहुभाषी असल्याने येथे एकापेक्षा अधिक भाषा शिकण्याची सुप्त इच्छा मुलांमध्ये असते. या स्थितीचा भाषा-शिक्षण प्रक्रियेत उपयोग करून घेऊन मातृभाषेबरोबरच इतर भाषांचे ज्ञान आत्मसात करण्यासाठी मुलांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे अथवा अनुवादाच्या माध्यमातून इतर भाषांतील मौलिक विचार मुलांपर्यंत पोहचविल्यास आपोआप भाषा शिक्षणाची प्रक्रिया विकासान्मुख होईल. ज्या पटीत बहुभाषिकता वाढेल, त्या पटीतच विकास होईल व आपला सामाजिक विकास झपाट्याने घडून येण्यास मदत होईल हे आपण मान्य करायला हवे.

भाषा शिक्षण प्रक्रिया गतिमान करण्यासाठी त्या-त्या प्रदेशातील प्रादेशिक भाषेचा अर्थात मातृभाषेचा प्रथमतःविकास करणे आवश्यक आहे.मातृभाषांच्या विकासावरच मुलांचा बौद्धिक आणि सामाजिक विकास अवलंबून आहे. भाषातज्ज्ञ या गोष्टींचा गांभीर्याने विचार करून विकासशील समाजासाठी आवश्यक असणाऱ्या भाषा-शिक्षण प्रक्रियेचे महत्व विशद करत आहेत हि समाधानाची बाब आहे.

**- रेणुका जालिंदर घोलप**
टी.वाय.बी.कॉम.

# विज्ञान आणि मानवी जीवन

संस्कृत भाषेत एक सुंदर सुभाषित आहे. त्याचा अर्थ असा आहे की, विज्ञान हा मानवाला मिळालेला एक प्रभावी डोळा आहे. त्याचा उपयोग जो करणार नाही तो खरोखरच आंधळा आहे. खरे पाहता, मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षा दुबळा आहे. त्याच्याजवळ हिंस्त्र प्राण्यांसारखी नखे वा दात नाहीत. त्याला पक्षांसारखे उडता येत नाही. वाघासारखे त्याचे घ्राणेंद्रिय तीक्ष्ण नाही. पण आज हा माणूस सर्व प्राण्यांत आपल्या बुद्धीच्या बळाने विज्ञानाच्या किमयेवर श्रेष्ठ व प्रबळ ठरला आहे.

विज्ञानाने माणसाला चाकाचे रहस्य सांगितले आणि माणसाची गती वाढली. पूर्वीच्या काळी बैलगाडी,रथ वापरणारा माणूस आता विजेचा शोध लागल्यावर आगगाडी-विमानातून फिरू लागला. तो रॉकेटच्या साहाय्याने अंतराळात चंद्रावर जाऊन पोहोचला आहे. स्वतः जवळ पंख नसले तरी उडण्याचे सामर्थ्य त्याने विमानाच्या साहाय्याने मिळविले. माणसाने विज्ञानाचा उपयोग करून आपल्या शस्त्रांना सामर्थ्यवान केले आहे.

मानवाच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला विज्ञानाने स्पर्श केला आहे. विज्ञानाच्या साहाय्याने माणसाने खते, संकरीत बी-बियाणे आणि अनेक कृषी अवजारे शोधून काढली. त्यामुळे कृषी उत्पादनात प्रचंड क्रांती झाली आहे. श्वेत क्रांती करून माणसाने दुध दुभत्याची चंगळ केली आहे. आता अनेक उपकरणे शोधून त्याने नाशवंत अन्न टिकाऊ स्वरुपात आणले आहे.

विज्ञानाच्या साहाय्याने माणसाने आपले आयुर्मानही खूप वाढवले आहे. आज माणसाने वैद्यकीय क्षेत्रात अनेक प्रयोग केले आहे. त्यामुळे माणूस दीर्घायुषी झाला आहे. अनेक असाध्य आजारांवर त्याने विज्ञानाच्या साहय्याने मात केली आहे. विविध अवयवांचे आरोपणही आता माणूस करू शकतो. त्वचारोपण, रक्तबदल, अशा अनेक अशक्य गोष्टी माणसाला आज विज्ञानाच्या साहाय्याने शक्य झाल्या आहेत.

असे हे विज्ञान मानवाला मिळालेले वरदान आहे. पण त्याचा अतिरेक व दुरुपयोग वाईटच. रासायनिक खतांमुळे पिके चांगली येतात हे दिसु लागताच आपण त्यांचा भरमसाठ वापर करू लागलो. त्यामुळे पिके चांगली येता येता जमीनच नापीक बनू लागली. अतिरेक वा दुरुपयोग शेवटी माणसाला नाशाकडेच नेतो. म्हणून आपण विज्ञानाकडे कसे पाहतो, त्याचा कसा उपयोग करून घेतो यावरच विज्ञान हे लाभदायक आहे की नुकसानकारक आहे हे ठरणार आहे.

**– अंजली बबनराव भुतकर**
टी.वाय.बी.कॉम

# हिंदी भाषा में रोजगार के अवसर

हिंदी में रोजगार के अवसरों को जानने से पूर्व अगर आप इन तथ्यों पर दृष्टि डालें तो पूरा परिदृश्य स्पष्ट हो जाएगा। हिंदी दुनिया की दूसरी सबसे ज्यादा बोली जाने वाली भाषा है। इस समय दुनियाभर में हिंदी बोलने

In academic year 2018-19 for the first year of B.sc 120 Students has selected Botany subject and in second year 86 students has selected same subject for study. The result of department is satisfactory in every year. The students of the department have showed their dynamic personality through active participation in various academic & extra-curricular activities of the college.

The following activities have carried out during this year by the department.

**Educational Tour -**

The department has arranged educational tour for overall knowledge of the subject such as Biotechnology, Medicinal Plants, Tissue culture, plant resources etc. All students of the department participated in this tour to know more about subject through field work & practical knowledge of various plants. The route of the tour was Ahmednagar - Ganpatipule -

Marleshwar - Raigad - Jijamata forest - Chavdartale - Ahmednagar.

**Educational Excursion -**

This excursion was for one day arranged by department on 20th January 2019. The route of the tour was Ahmednagar - Krishi Vidhnayan Kendra & Agriculture College Malegaon - Pratisthan College's Nakshtra botanical garden Baramati - Ahmednagar. The main aims behind this two different tour/ Excursion were to know the basic knowledge about the various territorial plants.

**Academic activities of the faculty -**

**Asst. Prof. K.V. Sable**

Participated in international conference on 'Recent Advances in traditional medicine, medicinal plants & photochemistry .organised by the department of Botany of Ahmednagar College Ahmednagar. In 8th & 9th February 2019.

**Asst. Prof B.B. Matade**
Head,
Department Of Botany.

# ग्रंथालय विभाग

ग्रंथालय हे महाविद्यालयाचा अत्यंत महत्त्वाचा घटक असून त्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांच्या ज्ञानात वृध्दी होते. तसेच त्यांना ज्ञात नसलेल्या विषयांची माहिती होते. त्यामुळे ग्रंथालयात विद्यार्थी व शिक्षकांसाठी पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ, मासिक, नियतकालिके, वर्तमानपत्र अवांतर वाचनासाठी पुस्तके अशा विविध स्वरुपाची पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी गंथालय विभागाच्यावतीने महाविद्यालयात विविध उपक्रम आयोजित केले जातात. यामध्ये वाचन प्रेरणादिन, मराठी भाषा दिन, निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, ग्रंथ प्रदर्शन इ. उपक्रम राबविले जातात. तसेच दरवर्षी कमवा व शिकवा योजने अंतर्गत गरजू विद्यार्थ्यांना ग्रंथालयात कामाचे वाटप करण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना काम करीत असताना पुस्तके व ग्रंथ यांची ओळख होऊन वाचनाची आवड निर्माण व्हावी हा उद्देश असतो.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये दि. ३/१०/२०१८ रोजी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन अहमदनगर येथील ज्येष्ठ महात्मा गांधी विचारवंत प्रा. डॉ. मोहनराव देशमुख व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सामाजिक उपक्रमात ग्रंथालय विभाग सहभागी झाला होता. तसेच दि. १५/१०/२०१८ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात ग्रंथालय विभाग सहभागी झाला होता. या कार्यक्रमात प्रसिध्द लेखक वि. वा. शिरवाडकर यांच्या नटसम्राट नाटकातील संवाद व मराठी कवितांचे वाचन डॉ.के. आर.पिसाळ यांनी केले. त्यास विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

महाविद्यालयातील ग्रंथालय पुस्तकांनी अधिकाधिक समृद्ध होण्यासाठी प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांचे मार्गदर्शनानुसार देणगी स्वरूपात पुस्तके स्विकारणे हा उपक्रम गेल्या तीन वर्षापासून सुरु आहे. त्यास तृतीय वर्ष कला व वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांनी ग्रंथालयास मौल्यवान पुस्तकांच्या पाच प्रती देणगी स्वरूपात भेट दिल्या त्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सध्या ग्रंथालयातील पुस्तकांची एकुण संख्या ३७५८ इतकी असून उत्तरोत्तर त्यात अधिक वाढ करण्याचा मानस आहे. यापुढील काळात ग्रंथालय विभागाच्यावतीने स्पर्धा परीक्षा व अवांतर वाचनासाठी मोठ्या प्रमाणात पुस्तके खरेदी करून त्यांच्यामध्ये संशोधनवृत्ती निर्माण होण्यासाठी विविध अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा ग्रंथालय विभागाचा मानस आहे.

**– प्रा. के.व्ही. येवले**
ग्रंथालय विभाग प्रमुख

# जिमखाना विभाग

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासुन क्रीडा विभाग कार्यरत आहे. सुरुवातीपासूनच जिमखाना विभागात विविध खेळाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

महाविद्यालयाचा क्रीडा क्षेत्रात आलेख उंचविण्यासाठी महाविद्यालयात कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल तसेच ॲथलेटिक्स, इनडोअर खेळ आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

दरवर्षीप्रमाणे २०१८-१९ या वर्षात देखील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध खेळात सहभाग नोंदवून यश प्राप्त केली आहे.

* शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षी झालेल्या आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत जिजामाता भेंडे कॉलेज येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.
* तसेच सी.डी. जैन कॉलेज श्रीरामपूर येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत (६० कि.ग्रॅ.) वजन गटात महाविद्यालयाचा विद्यार्थी पवार मनोहर काशिनाथ (एस.वाय.बी.एस्सी) याने प्रथम क्रमांक मिळविला व त्याची वाघोली (पुणे) येथे विभागीय पातळीवर निवड झाली.
* त्याप्रमाणे संगमनेर कॉलेज, संगमनेर येथे झालेल्या आंतरमहाविद्यालयीन ॲथलॅटिक्स स्पर्धेत १०० मी, २०० मी, व ४०० मी धावणे या क्रीडा प्रकारात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली.

## शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी

सावित्रीबाई फूले पुणे विद्यापीठाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी प्रथम वर्ष सर्व वर्गासाठी अनिवार्य करण्यात आली आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयात प्रथम वर्ष सर्व वर्गातील विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण क्षमता चाचणी परीक्षेचे आयोजन दि. २१/०३/२०१९ ते २२/०३/२०१९ या रोजी करण्यात आले होते. या क्षमता चाचणीसाठी बहिःस्थ परीक्षक म्हणून डॉ. मगर एस.बी.(न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अ.नगर) यांनी काम पाहिले.

महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकवृंद यांचे संपूर्ण वर्षभर क्रीडा विभागास सहकार्य लाभले.

**– प्रा. अे.के. आहेर**
शारीरिक शिक्षण संचालक

# वाङ्मय मंडळ

मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये भाषा व साहित्याची आवड निर्माण व्हावी. साहित्यातून समाजाचे दर्शन व्हावे. तसेच विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या साहित्य गुणांचा विकास व्हावा यासाठी महाविद्यालयात वाङ्मय मंडळ सदैव विविध उपक्रम राबवित असते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांचे जयंती निमित्त महाविद्यालयात वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक विभाग यांचे संयुक्त विद्यमाने निबंध व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एकुण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विजेत्यांना प्रमुख पाहुणे श्री. गायकवाड साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे शुभहस्ते रोख पारितोषिक व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर दि. १५/१०/२०१८ रोजी डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांचे जयंती दिनी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वाङ्मय मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.एस. ए. काळे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.के.बी. ताके, ग्रंथपाल प्रा. श्रीमती येवले, प्रा. आर.ए. नेटके, प्रा.पी.एस. साबळे, प्रा. बी.एस. पवळे आदींसह रा.से.यो विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रख्यात लेखक वि. वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' नाटकातील संवादाचे वाचन करण्यात आले. तसेच प्रा. डॉ. के. आर. पिसाळ यांनी काव्यवाचन केले. यानंतर दि. १४/१/२०१९ रोजी जिजामाता महाविद्यालय, भेंडे ता. नेवासा जि. अहमदनगर येथील मराठी विभाग प्रमुख तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. शिरीष लांडगे पाटील याचे शुभहस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते. या प्रसंगी डॉ. शिरीष लांडगे पाटील यांनी मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. मराठी भाषेला ज्ञानोबा तुकोबांचा आशीर्वाद आहे. त्यामुळे मराठी भाषेची चिंता करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांनी मातृभाषा म्हणून मराठी भाषेचे संवर्धन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**– प्रा.डॉ.के.आर. पिसाळ**
वाङ्मय मंडळ प्रमुख

# सांस्कृतिक मंडळ

मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे म्हणून महाविद्यालयात निबंध, रांगोळी, वक्तृत्व, काव्यवाचन अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. याबरोबरच थोर महापुरुषांची जयंती व पुण्यतिथी कार्यक्रम साजरे करण्यात येतात.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्यावतीने घेण्यात आलेले कार्यक्रम पुढील प्रमाणे -

* दिनांक ०८ जुलै २०१८ रोजी लोकनेते स्व. मारुतरावजी घुले पाटील यांची १६ वी पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम घेऊन अभिवादन करण्यात आले.
* दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली.
* दिनांक १३ सप्टेंबर २०१८ रोजी लोकनेते मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय दहिगांव ने या ठिकाणी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी कु. पाटोळे तेजल देवानंद व कु. वैराळ सीताराम रवींद्र यांनी सहभाग घेतला.
* दिनांक १५ सप्टेंबर २०१८ रोजी लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांची ८८ वी जयंती साजरी करण्यात आली. या जयंती निमित्त रांगोळी व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बी.टी. गायकवाड व व्याख्याते म्हणून श्री. डी.एच. घुले उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी भूषविले.
* दिनांक ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. मोहनराव देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट उपस्थित होते.
* दिनांक ०३ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.
* दिनांक १२ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती, युवा दिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली.
* दिनांक १५ जानेवारी २०१९ रोजी महाविद्यालयात भूगोल दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ. माया उंडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.टी.एम.वराट उपस्थित होते.
* दिनांक १८ फेब्रुवारी ते दिनांक २१ फेब्रुवारी २०१९ या कालावधीत महाविद्यालयात विविध प्रकारचे डेज साजरे करण्यात आले. या उपक्रमाला सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.
* दिनांक १९ फेब्रुवारी २०१९ रोजी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. विजय कदम व शिवव्याख्याते श्री. विक्रम अवचिते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट उपस्थित होते.

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ मध्ये संपूर्ण वर्षभर आयोजित केलेल्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी. एम. वराट, सांस्कृतिक मंडळाचे सदस्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवकवृंद व विद्यार्थी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**- प्रा. एन.एन झिंज**
अध्यक्ष, सांस्कृतिक मंडळ

# राष्ट्रीय सेवा योजना

मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यरत आहे. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत एकुण शंभर स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी आहेत. त्याद्वारे महाविद्यालयात वर्षभर विविध उपक्रम व कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रथम वन महोत्सव सप्ताह अंतर्गत महाविद्यालयात प्राचार्य डॉ. टी.एम.वराट यांच्या मार्गदर्शनानुसार वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर मंगळवार दि. ७/८/२०१८ रोजी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील रा.से.यो. कार्यक्रमांचे उद्घाटन न्यू लॉ. कॉलेज अ.नगर येथील माजी रा.से.यो. तालुका समन्वयक प्रा.व्ही.इ.शिंदे यांचे शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट हे होते. त्यानंतर नियमित कार्यक्रमांर्तगत महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन, स्वच्छता पंधरवडा, शिक्षकदिन, लोकनेते मारुतरावजी घुले पाटील जयंती, राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती, वाचन प्रेरणा दिन, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती, स्वामी विवेकानंद जयंती, युवा सप्ताह, हुतात्मा दिन, प्रजासत्ताक दिन हे कार्यक्रम घेण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार दि. ६/९/१८ रोजी केरळ पुरग्रस्तांसाठी मदत फेरी काढून राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी एकुण सात हजार सहाशे तीस रुपये जमा केले. ही रक्कम बँकेद्वारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या खात्यात जमा करून पोहोच पावती घेतली. या उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ. टी.एम.वराट यांनी सर्व रा.से.यो. विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यानंतर शुक्रवार दि. २१/९/२०१८ रोजी 'स्वच्छता हिच सेवा' या उपक्रमांतर्गत रा.से.यो. विद्यार्थ्यांनी रॅली काढुन राघवेंद्र स्वामी मंदिर व परिसर स्वच्छ केला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे यासाठी सोमवार दि. २४/९/२०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनी महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे न्यु आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सिनेट सदस्य प्रा.डॉ. बाळासाहेब सागडे हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी रा.से.यो. दिनाविषयी अनमोल मार्गदशन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एंम. वराट यांनी भूषविले.

मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती दिनाचे औचित्य साधून बुधवार दि. ३/१०/२०१८ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन अहमदनगर येथील ज्येष्ठ महात्मा गांधी विचारवंत प्रा.डॉ. मोहनराव देशमुख व प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे शुभहस्ते करण्यात आले.

या रक्तदान शिबिरात एकुण २२ (बावीस) रा.से.यो. विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. तसेच यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थीनीची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विशेष श्रम संस्कार शिबीर पिंपळगांव उज्जैनी ता.नगर जि. अहमदनगर येथे दि. २१/१२/२०१८ ते २७/१२/२०१८ या कालावधीत घेण्यात आले. या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील ५० (पन्नास) स्वयंसेवकांची निवड करण्यात आली होता. यामध्ये मुले २९ व मुली २१ सहभागी झाले होते. या शिबिरात समतल पातळी चर, वनराई बंधारा, स्वच्छता अभियान, जल संवर्धन, वृक्ष संवर्धन, व्यसन मुक्ती, बेटी बचाव अभियान, ग्राम सर्वेक्षण, व्यक्तिमत्व विकास आदी उद्दिष्टये ठेवून कार्यक्रम घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन अहमदनगर येथील युवा नेते मा. अक्षयदादा कर्डिले यांचे शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भेंडा येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे जनरल मॅनेजर मा.श्री. काकासाहेब शिंदे हे

होते. या प्रसंगी पिंपळगांव उज्जैनी गावच्या सरपंच सौ. चंद्रकला वाघ, उपसरपंच सौ. राजश्री ताई आल्हाट, अ.नगर कृषि उत्पन्न बाजार समिती सदस्य मा.श्री. जगन्नाथ मगर पाटील, प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, प्राचार्य डॉ. संध्या जाधव, प्राचार्य डॉ. विजय जाधव, मुख्याध्यापक श्री. बी. झेड. तोडमल, ग्रामस्थ, प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवकवृंद व रा.से.यो. विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. ए. काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्रीमती मनिषा पुंड यांनी केले तर आभार प्रा. श्रीमती कांडेकर यांनी मानले.

या शिबिर काळात पिंपळगांव उज्जैनी गावातील महादेव मंदिर, दत्त मंदिर, चर्च, प्राथमिक शाळा परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच महादेव मंदिरा भोवतालच्या परिसरातील मातीचे ढिगारे सपाट करून झाडांसाठी खड्डे खोदण्यात आले. या शिवाय वनराई बंधारा, ओढ्याच्या काढावरील रस्ता, ग्राम सर्वेक्षण आदी कामे करण्यात आली. अखेर शेवटच्या समारोप दिनी रा.से.यो. विद्यार्थ्यांनी पथ नाट्याद्वारे समाज प्रबोधन केले.

शिबीर काळात दुपारी २ ते ४ या वेळेत रा.से.यो. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार शनिवार दि. २२/१२/२०१८ रोजी प्राचार्य डॉ. संध्या जाधव यांनी 'वृक्षसंवर्धन', रविवार दि. २३/१२/२०१८ रोजी प्रा. डॉ. किसन पिसाळ यांनी 'व्यसनमुक्ती व आजचा युवक', सोमवार दि. २४/१२/२०१८ अहमदनगर कृषि अधिकारी यांनी समतल पातळी चर व वनराई बंधारा, मंगळवार दि. २५/१२/२०१८ रोजी प्रा.डॉ. वर्षा किर्तने यांनी 'युवकाची सामाजिक बांधिलकी', बुधवार दि. २६/१२/१८ रोजी प्रा.डॉ. मोहनराव देशमुख यांनी 'महात्मा गांधी विचार व स्वच्छता' आदी विषयावर मान्यवरांची व्याख्याने घेण्यात आले.

विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ गुरुवार दि. २७/१२/२०१८ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पिंपळगांव उज्जैनी गावच्या सरपंच सौ. चंद्रकला कानिफनाथ वाघ या होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून एकता महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.आर.डी. मेहेत्रे हे होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. टी.एम.वराट, प्राचार्या डॉ. संध्या जाधव, प्राचार्य डॉ. विजय जाधव, उपसरपंच सौ. राजश्रीताई आल्हाट, श्री. कानिफनाथ वाघ, चेअरमन कानिफनाथ गंगाधर वाघ, प्राध्यापक, ग्रामस्थ, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.भाऊसाहेब मुळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मनिषा पुंड यांनी केले. आभार प्रा.बी.एस.पवळे यांनी मानले. हे श्रमसंस्कार शिबीर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, मारुतरावजी घुले पाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर, बाणेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बुऱ्हाणनगर, अहमदनगर तसेच एकता कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सावेडी, अहमदनगर याचे संयुक्त विद्यमाने यशस्वीरित्या संपन्न झाले.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या उपक्रम व कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट, प्राध्यापक, प्राध्यापेकतर सेवकवृंद व रा.से.यो. विद्यार्थी यांचे अनमोल सहकार्य लाभले.

**– प्रा. एस.ए. काळे**
राष्ट्रीय सेवा योजना
कार्यक्रम अधिकारी

# विद्यार्थी विकास मंडळ

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ वर्षात विद्यार्थी विकास मंडळाद्वारे विविध कार्यक्रम राबविण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळास पाठवलेल्या प्रस्तावानुसार महाविद्यालयास कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेस मान्यता मिळाली. त्यानंतर गरजू व सहा लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या एकूण २१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये १० विद्यार्थी व ११ विद्यार्थीनींची निवड करण्यात आली.

विद्यार्थी विकास मंडळाच्या नियमानुसार कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार महाविद्यालयातील कामाचे वाटप करून प्रत्यक्ष अमंलबजावणी करून कामास सुरुवात झाली. जुलै महिन्यात २५३ तास काम विद्यार्थ्यांनी केले. सप्टेंबर महिन्यात या योजनेत अधिक उत्साहाने काम केले. यामध्ये महाविद्यालय परिसरातील गवत काढणे, वृक्ष संगोपन, ग्रंथालय स्वच्छता करणे, ग्रंथालतील पुस्तके व्यवस्थित ठेवणे, सायन्स लॅब स्वच्छ करणे आदी कामे केली.

ऑक्टोबर महिना हा परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याने विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद या योजनेस प्राप्त झाला. या कालावधीत कॉलेज ऑफिसमध्ये विद्यार्थीना काम दिले तसेच केमिस्ट्री लॅब, कॉम्प्युटर लॅब यामध्ये असणाऱ्या साहित्याची स्वच्छता करून व्यवस्थित मांडणी केली.

नोव्हेंबर महिन्यात दिवाळी सुट्टी होती. त्यानंतर डिसेंबर जानेवारी, फेब्रुवारी या तीनही महिन्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेचा गरजू विद्यार्थ्यांना खूप उपयोग झाला.

यासोबतच विद्यापीठाने वेळोवेळी निर्देश केलेल्या सूचनेचे पालन करून कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये संविधान दिन, लोकशाही पंधरवडा, मातृभाषा पंधरवडा, मराठी राजभाषा दिन, वाचन प्रेरणा दिन, महापुरुषांची जयंती, वृक्ष संवर्धनाची मोहीम हाती घेण्यात आली.

**– प्रा.डॉ. आर.ए. नेटके**
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी

# बहिःशाल विभाग

जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे, मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय अहमदनगर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील बहिःशाल शिक्षण केंद्रांतर्गत सन २०११ पासून डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यान मालेचे तर सन २०१८-१९ पासून 'एक दिवसीय जेष्ठ नागरिक शिबीराचे' महाविद्यालयात आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयीन अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समस्यांविषयी जाणीव जागृती निर्माण होऊन सामाजिक व वैयक्तिक समस्या सोडविण्यास ते सक्षम

व्हावेत, त्यांच्यातून जबाबदार नागरिक निर्माण व्हावेत या उद्देशाने महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमाले अंतर्गत अनेक तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

महाविद्यालयात दि. ३१/०१/२०१९ ते ०२/०२/२०१९ या कालावधीत डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. डॉ. जोशी विजयकुमार यांनी 'हसण्यावर टॅक्स नाही', प्रा.डॉ. कदम शत्रुघ्न यांनी 'स्वामी विवेकानंद' तर प्रा. देशमुख चंद्रभान यांनी 'संत गाडगेबाबा' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच दि. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी महाविद्यालयात 'एक दिवसीय जेष्ठ नागरिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गरजेवर आधारीत या उपक्रमाद्वारे जेष्ठांच्या आरोग्य विषयक समस्या, राहणीमान, सकस आहार, कुटुंबात मिळणाऱ्या सोयीसुविधा, ध्यान धारणा, सकारात्मक जीवनशैली, आधुनिक उपचार पध्दती, वैद्यकिय सुविधा तसेच जेष्ठांसाठी शासन राबत असलेल्या विविध योजना महाविद्यालयात या शिबीरांतर्गत तज्ज्ञ प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

महाविद्यालयात दि. १८/०२/२०१९ रोजी एक दिवसीय जेष्ठ नागरिक शिबीरांतर्गत प्रा. कोरडे उषा यांनी ज्येष्ठांच्या समस्या', प्रा. अशोक आहेर यांनी 'ज्येष्ठांची जीवनशैली सकारात्मक-नकारात्मक' तर प्रा. वृषाली गायकवाड यांनी 'आध्यात्मातून समाज प्रबोधन' या विषयावर मार्गदर्शन केले.

वरील दोन्ही कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर वृंद यांचे सहकार्य लाभले.

**– प्रा. श्रीमती जी.एस. सोनवणे**
बहिःशाल केंद्र कार्यवाहक

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

प्रशासकीय पदे मिळवून या देशाचे कार्यक्षम असे प्रशासक बनण्याची स्वप्ने विद्यार्थी पाहतात. पण आणखी एक महत्त्वाचे म्हणजे मोठ्या स्वप्नांच्या पूर्णत्वासाठी त्यांना तेवढेच योग्य व कार्यक्षम मार्गदर्शन व अभ्यासाची आवश्यकता असते. हा एक उद्देश डोळ्यासमोर ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची प्रशासकीय क्षेत्रात अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी योग्य मार्गदर्शन व अभ्यास साहित्य पुरविण्यासाठी महाविद्यालय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन हा उपक्रम चालवित आहे.

महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राची सुरुवात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये करण्यात आली. दि. १३/०२/२०१७ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उद्घाटन मा. प्राध्यापक ए.बी. उगले (भूगोल विभाग प्रमुख) न्यु. आर्टस् कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या स्पर्धा परीक्षा केंद्राअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये ४५ विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात आली. या वर्षामध्ये वेळापत्रकानुसार नियमित व्याख्याने घेण्यात आली. स्पर्धा परीक्षा केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नियमित सर्व वर्तमानपत्रे, मासिके, विविध पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. केंद्रातील सर्व विषयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार नियमित मार्गदर्शन केले.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये काही तज्ज्ञ व्याख्यात्यांची विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

* मा.श्री. विनोद चव्हाण साहेब (पी.एस.आय.) एम.आय.डी.सी., अहमदनगर यांनी दि. ५/०९/२०१८ रोजी 'ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षा' या विषयावर व्याख्यान दिले.

* डॉ. दिलीप भनगडे (Investor Avareness Programme Mumbai Universsity) यांनी दिनांक ५/०१/२०१९ रोजी ''पदवीनंतर करिअरच्या विविध संधी व गुंतवणुकीचे विविध नवीन स्त्रोत' या विषयावर मार्गदर्शन केले.

या विभागात शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून स्पर्धा परीक्षा तयारीसाठी व अभ्यासासाठी विविध तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन व विविध मासिके, पुस्तके आणखी चांगल्या रितीने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

या माध्यमातून विद्यार्थ्यांना नक्कीच विविध क्षेत्रात करिअर घडविण्याची संधी मिळेल व भविष्यात उत्तुंग असे यश ते मिळवतील अशी आम्हां सर्वांना खात्री वाटते.

**– प्रा. पी.एस. साबळे**
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रप्रमुख

# प्रसिद्धी विभाग

महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्षे २००९-१० पासून हा विभाग कार्यरत आहे. या विभागांतर्गत महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षामध्ये होणाऱ्या विविध उपक्रमांना प्रसिध्दी दिली जाते. यामध्ये स्थानिक वर्तमानपत्रात महाविद्यालयातील विविध कार्यक्रमांचा गोषवारा, फोटो, बातमी देण्यात येते. ज्या विभागाचा उपक्रम आहे किंवा कार्यक्रम घेतला आहे; त्या विभागाकडून त्या उपक्रमाची सविस्तर प्रेस नोट तयार करून प्रसिध्दी विभागाकडे दिल्यानंतर वर्तमान पत्रांमध्ये बातमी दिली जाते.

सदर कामासाठी प्रा.डॉ.के.आर. पिसाळ, प्रा.एस.बी. दहातोंडे, श्री. पी.व्ही. दळवी तसेच इमेज फोटोग्राफर श्री अशोक मुकिंदे यांची मदत घेतली जाते. सदर बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर विद्यार्थी नोटिस बोर्डला लावली जाते. अशाप्रकारे बातमी कात्रण फाईल महाविद्यालयाच्या स्थापनेपासून तयार करून ठेवली आहे. गेल्या १० वर्षातील महाविद्यालयाच्या १०० पेक्षा जास्त विविध उपक्रमांच्या बातम्यांचे कात्रण संग्रहित आहे. तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रम व कार्यक्रमांचे फोटो संग्रहित करून महाविद्यालयीन वार्षिक अंक 'क्षितिज' यामध्ये सामाविष्ट करून उपक्रमांची माहिती दिली जाते. या विभागाअंतर्गत पत्रकारांचाही सन्मान केला जातो. भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हा अध्यक्षपदी पत्रकार श्री. बाळासाहेब जाधव यांची निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाकडून प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार सघंटना शेवगांव, तालुका सरचिटणीस पदी पत्रकार श्री. शंकर मरकड यांची निवड झाली म्हणून त्यांचाही सन्मान करण्यात आला. तसेच अहमदनगर जिल्हा कार्याध्यक्ष पत्रकार श्री. दिपक खोसे तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया तालुका अध्यक्ष पत्रकार श्री. अशोक वाघ, लोकमतचे पत्रकार श्री. अण्णासाहेब नवथर, गणेश निळकंठी, संजय भालेराव, सकाळचे छायाचित्रकार श्री. दत्ता इंगळे यांचे विशेष सहकार्य मिळत असते. या विभागामुळे सर्व महाविद्यालयीन उपक्रमांना प्रसिध्दी दिली जाते. महाविद्यालयाचा हा अनमोल ठेवा दरवर्षी प्रसिध्दी विभागाच्या वतीने संग्रहित केला जातो. या कामी प्रसिद्धी विभागातील सर्व सदस्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी या सर्वांचे सहकार्य मिळते.

**– प्रा. एस.व्ही. मरकड**
प्रसिध्दी विभाग प्रमुख

# पर्यावरण जाणीव जागृती उपक्रम

महाविद्यालयामध्ये पर्यावरण जाणीव जागृती हा विषय शिकविला जातो. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव निर्माण करण्याविषयीची माहिती दिली जाते. त्यामध्ये पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, जंगलतोड जागतिक तापमान वाढ, दुष्काळ, वाढते नागरीकरण, ग्रीन सिटी, स्वच्छ भारत अभियान याविषयी माहिती दिली जाते.

पर्यावरण जाणीव जागृती हा विषय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्याकडून द्वितीय वर्ष कला, वाणिज्य, शास्त्र व संगणकशास्त्र या वर्गासाठी अनिवार्य करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती निर्माण करणे हे पर्यावरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. पर्यावरणाचा शाश्वत विकास करून संरक्षण करणे हे पर्यावरण विभागाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी आपण महाविद्यालयात दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रामध्ये ‘पर्यावरणपूरक मानवी विकासः समस्या व समाधान’ या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते.

या चर्चासत्राचे उद्‌घाटन डॉ. प्रविण सप्तर्षी यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री. के.के. पवार उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट, संस्था समन्वयक प्रा. डॉ.आर.आर. सासवडे, प्रा. श्रीमती डिसूझा आदी मान्यवर उपस्थित होते. या दोन दिवसीय चर्चासत्रामध्ये पर्यावरण क्षेत्रातील विविध अभ्यासकांनी पर्यावरणपूरक मानवी समस्या विस्तृतपणे व्यक्त केल्या. तसेच मानवी विकासाच्या दृष्टीने त्यावरील उपायही सोदाहरण स्पष्ट केले. या राज्यस्तरीय चर्चासत्रास पर्यावरणप्रेमींकडून उस्फूर्त सहभाग मिळाला. त्यामुळे हा विषय विद्यार्थी व पर्यावरणप्रेमींना संस्मरणीय ठरला.

**– प्रा. व्ही. डी. मोरे**
पर्यावरण विभाग प्रमुख

# महिला तक्रार निवारण समिती

महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत मुलींच्या समस्या जाणून घेऊन त्या समस्येवर उपाय करून त्यांना शिक्षणास प्रवृत्त केले जाते. त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थीनींच्या समस्या या समितीच्या अंतर्गत सोडविण्यात आल्या. यामध्ये विशेषतः महाविद्यालयाकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा तसेच मुलींच्या अडचणी याची दखल महिला तक्रार समितीद्वारे घेतली जाते.

या वर्षी महिला तक्रार निवारण समितीद्वारे दखल घेण्यात आली की, एका विद्यार्थ्याने एका विद्यार्थीनीची छेडछाड केल्याबद्दल त्याचा महाविद्यालायातून प्रवेश रद्द करण्यात आला. तसेच महाविद्यालयात वेळोवेळी जिल्ह्याचे दामिनी पथक व निर्भया पथक बोलवण्यात येते. जेणे करून बाहेरील टारगट तरुणांचा महाविद्यालयीन विद्यार्थीनींना त्रास दिला जाऊ नये. अशा पध्दतीने महिला तक्रार निवारण समिती मुलींच्या समस्येची दखल घेऊन नियमानुसार कार्यवाही करते.

**महिला तक्रार निवारण समिती –** १) प्राचार्य डॉ.टी.एम. वराट – अध्यक्ष
२) प्रा. पाऊलबुध्दे ए.आर. – प्रमुख ३) प्रा. पवळे बी.एस. – सदस्य ४) प्रा. सोनवणे जी.एस. – सदस्य
५) प्रा. साबळे पी.एस.– सदस्य ६) कु. निमसे एस. – सदस्य ७) कु. पाटोळे टी.पी. – सदस्य
८) कु. भोर पी.बी. – सदस्य

# विज्ञान मंडळ

मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड, दृष्टिकोन, वैज्ञानिक संशोधन, प्रकल्प साहित्य यामध्ये रुची निर्माण होऊन त्यांचा बौध्दिक विकास होण्यासाठी विज्ञान मंडळ महाविद्यालयात कार्यरत आहे. त्यासाठी महाविद्यालयात विज्ञान विषयक विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शै.वर्ष २०१८-१९ यामध्ये दि. ११/९/१८ रोजी महाविद्यालयात विज्ञान मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले. विज्ञान मंडळाचे उद्‌घाटन डॉ. व्ही. के. धस (भौतिकशास्त्र विभाग प्रमुख न्यु आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय अहमदनगर) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी भूषविले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक विज्ञान मंडळ प्रमुख प्रा. जगताप पी.पी. यांनी केले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक संकल्पना वृध्दिंगत होतील असे मोलाचे मार्गदर्शन केले. शै.वर्ष २०१८-१९ मध्ये विज्ञान मंडळातर्फे २८/०१/२०१९ रोजी 'पर्यावरण विकास व पशुसंवर्धन आधारित आधुनिक शेती' असे नविन विषय अनुसरून निबंध स्पर्धा घेण्यात आली. त्याचप्रमाणे विज्ञान दिनाचे औचित्य साधुन विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा विद्यार्थ्यांकरीता आयोजित करण्यात आली होती. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.

दि. २८/२/२०१९ रोजी महाविद्यालयात 'विज्ञान दिन' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. बी.जे. अप्पाराव (प्राचार्य-जिजामाता महाविद्यालय, भेंडे, ता. नेवासा, अहमदनगर) हे प्रमुख पाहुणे म्हणुन लाभले होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. टी.एम.वराट यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. विज्ञान मंडळातर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विजेत्यांचे प्रमुख पाहुणे डॉ. बी.जे. अप्पाराव व अध्यक्ष प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांनी स्मृतीचिन्ह व पारितोषिक देऊन गौरविले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ.बी.जे. अप्पाराव यांनी 'शास्त्रज्ञ होण्यासाठी पारंपारिक आणि प्रयोगशालेय साधनांसहित नाविण्यपूर्ण कल्पनांचीही नितांत आवश्यकता आहे' असे सांगून विद्यार्थ्यांना विज्ञानाप्रती उत्स्फूर्त शब्दांत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**– प्रा. पी.पी. जगताप**
विज्ञान मंडळ प्रमुख

# Internal Quality Assurance Cell (IQAC)

Internal Quality Assurance Cell (IQAC) is established in the college as per the guidelines of National Assessment and Accreditation Council (NAAC). The IQAC is a part of the college system and it works towards realization of the goals of quality enhancement, the objectives of IQAC are to develop a system for conscious, consistent and catalytic action to improve the academic and administrative performance of the institution.

IQAC will facilitate or contribute to ensure high tended level of clarity and focus in institutional functioning towards quality enhancement. It also ensures internalization of the quality culture, it acts as a dynamic system for quality changes in Higher Education Institution.

**Internal Quality Assurance Cell -**

| Sr.No. | Category | Name of the Members |
|---|---|---|
| 1. | Special Invitees | 1. Hon. Dr. Narendra Ghule Patil<br>President J.S.P. Mandal, Dahigaon ne<br>2. Hon.Shri. Chandrashekhar Ghule Patil<br>Secretary J.S.P. Mandal, Dahigaon ne |
| 2. | Chairperson | Hon. Principal Dr. T.M. Varat |
| 3. | Teachers | 1. Prof. S.V. Markad<br>2. Prof. M.B. Chopade<br>3. Prof. B.S. Pawale<br>4. Prof. P.A. Phatangare<br>5. Prof. S.B. Dhatonde |
| 4. | Nominee from Local Society | Shri. Mahendra Dhamane<br>President, Alumni |
| 5. | Administrative Officer | Shri. P.V. Dalvi |
| 6. | Co-ordinator | Prof. K.B. Take |

IQAC Committee meetings are conducted twice in a year. Academic activites which are carried out during the academic term as well as preparation of the Annual Quality Assurance Report (AQAR) as per guidelines of the NAAC were discussed in the meetings.

The Co-ordinator of IQAC always communicate the objectives, aims of IQAC to all faculty members and keep documentation of various programs and activities carried out in the college. He also collects feedback response from students, parents on quality related activities in the college.

# संशोधन समिती

महाविद्यालयामध्ये संशोधन प्रक्रिया विकसित होण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली आहे. याद्वारे प्राध्यापकांना संशोधनाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना संशोधन करण्यास प्रवृत्त केले जाते. उदा. लघुशोध प्रकल्प सादर करणे, एम.फिल अथवा पीएच.डी. साठी नोंदणी करणे, राज्य व देश पातळीवरील कार्यशाळा, चर्चासत्रे अथवा परिषदांमध्ये शोध निबंधाचे वाचन करणे. तसेच विविध शोध पत्रिकेमध्ये प्राध्यापकांनी आपल्या विषयाचे शोध निबंध प्रकाशित करणे. या विषयी मार्गदर्शन करून संशोधनामध्ये गती निर्माण होण्यासाठी ही समिती कार्य करीत असते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांचे अध्यक्षतेखाली नियमित सभा आयोजित करून संशोधनवृत्ती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच संशोधन कार्यशाळा, चर्चासत्र अथवा परिषदा यामध्ये सहभागी होणाऱ्या प्राध्यापकांना महाविद्यालयाच्यावतीने आर्थिक साहाय्य देण्यात आले. एकंदरीत संशोधन समितीद्वारे केलेले कार्य व संशोधनात्मक कार्य वृध्दिंगत होण्यासाठी महाविद्यालयाने दाखविलेला सकारात्मक दृष्टिकोन यामुळे संशोधनवृध्दीत वाढ झाल्याचे दिसून येते.

## संशोधन समिती

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १) | प्राचार्य डॉ.टी.एम. वराट | संशोधन समिती प्रमुख |
| २) | प्रा.डॉ. के.आर. पिसाळ | सदस्य |
| ३) | प्रा. बी. एस. पवळे | सदस्य |
| ४) | प्रा. के. बी. ताके | सदस्य |
| ५) | प्रा. एम.एस. गवारे | सदस्य |

# माजी विद्यार्थी संघ

या विभागाअंतर्गत दरवर्षी माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन १० फेब्रुवारी २०१९ रोजी करण्यात आले होते. माजी विद्यार्थी परिवार एकत्र येऊन जुन्या आठवणींना उजाळा मिळावा व दुरावलेले मित्र या निमित्ताने एकत्र यावेत व आजी-माजी विद्यार्थ्यांमध्ये करिअर विषयक विचारांची देवाण-घेवाण व्हावी असा उपक्रमाचा उद्देश आहे. माजी विद्यार्थी व महाविद्यालय यांचा ऋणानुबंध कायम रहावा, महाविद्यालयाच्या विकासामध्ये त्यांनी मोलाच्या सूचना कराव्यात तसेच विविध माध्यमातून महाविद्यालयासाठी योगदान द्यावे इत्यादी गोष्टींसाठी महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघाचे महत्त्व आहे.

* दिनांक १० फेब्रुवारी २०१९ या दिवशी माजी विद्यार्थी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या माजी विद्यार्थी मेळाव्यात कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विभाग या विभागातील स्नातक पदवी संपादन केलेले माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक तसेच अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट हे होते. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी विविध उच्च पदावर कार्यरत असणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एस.व्ही. मरकड यांनी केले. तसेच श्री. महेंद्र धामणे, सुजित ठोंबरे, सनी सप्रे, घनश्याम मैड, महावीर डागा या माजी विद्यार्थ्यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.एस. साबळे यांनी केले. तर आभार प्रा.बी.एस. पवळे यांनी मानले.

* . दिनांक १ मार्च २०१९ रोजी महाविद्यालयात माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचे मार्गदर्शन प्राचार्य डॉ.टी.एम.वराट यांनी केले. गुरुवार दि. ७/३/२०१९ रोजी सहाय्यक संस्था निबंधक अहमदनगर यांच्याकडून संघाला अधिकृतरित्या संस्था नोंदणी/प्रमाणपत्र नोंदणी क्रमांक **महाराष्ट्र २२१/२०१९ अहमदनगर मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयीन माजी विद्यार्थी संघ बोल्हेगांव अहमदनगर** या नावाने मिळाले आहे. त्यानुसार माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्याता आली. या संघातले पदाधिकारी खालीलप्रमाणे असून पुढील पाच वर्षासाठी ते कार्यरत असणार आहे.

### * माजी विद्यार्थी संघ *

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | – श्री. महेंद्र धामणे | २) | उपाध्यक्ष | – श्री. सुजित ठोंबरे |
| ३) | सचिव | – प्रा. एस.व्ही. मरकड | ४) | खजिनदार | – प्रा.बी.एस. पवळे |
| ५) | सदस्य | – श्री. अमोल भवार | ६) | सदस्य | – वैशाली वाकचौरे |
| ७) | सदस्य | – राकेश वाघ | ८) | सदस्य | – किशोर धोत्रे |
| ९) | सदस्य | – स्वप्नील देठे | | | |

* दि. ९ मार्च २०१९ रोजी तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रम प्रसंगी माजी विद्यार्थी संघ अध्यक्षपदी निवड झालेले श्री. महेंद्र धामणे व सर्व सदस्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम. वराट यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच या कार्यक्रम प्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष श्री. महेंद्र धामणे यांनी तृतीय वर्षांच्या सर्व विद्यार्थ्यांचे माजी विद्यार्थी संघामध्ये स्वागत केले. महाविद्यालयाच्या विकासासाठी विविध योजनांचे नियोजन करण्यात येईल असे त्यांनी माजी विद्यार्थी संघाच्यावतीने सांगितले.

**– प्रा. एस.व्ही. मरकड**
माजी विद्यार्थी संघ प्रमुख

# परीक्षा विभाग

परीक्षा विभाग हा महाविद्यालयातील अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. महाविद्यालयात वर्षभरात विद्यापीठ परीक्षा, अंतर्गत परीक्षा आयोजित केल्या जातात. वरील सर्व परीक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. अंतर्गत व विद्यापीठाने ठरवून दिलेल्या नियमानुसार घेतल्या जातात. प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षांचे वेळापत्रक तयार करण्यात येते. परीक्षा सूरक्षित व निकोप वातावरणात पार पाडता यावी यासाठी महाविद्यालयात परीक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी यासाठी परीक्षा विभागाने प्रत्येक परीक्षेला महत्त्व दिले आहे. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही तसेच कॉफीमुक्त वातावरणात परीक्षा पार पडाव्यात यासाठी विभागाने विशेष काळजी घेतली आहे.

परीक्षा विभाग झेरॉक्स, इंटरनेट सारखा सुविधांनी परिपूर्ण आहे. तसेच महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा आहे. चालु शैक्षणिक वर्षात मार्च-एप्रिल २०१९ परीक्षेसाठी ८६९ परीक्षार्थी उपस्थित होते. दि. ३० जानेवारी २०१९ रोजी जिजामाता शास्त्र, कला व वाणिज्य महाविद्यालय, भेंडा येथे पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मा. डॉ.एस.बी. निमसे (माजी कुलगुरु स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड (महा.) व लखनौ विद्यापीठ, लखनौ (उत्तर प्रदेश) याच्या प्रमुख उपस्थितीत पदवी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.आ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील (अध्यक्ष श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्था) होते. सदर कार्यक्रमात महाविद्यालयातील २७ विद्यार्थ्यां पदवी प्रदान करण्यात आली. परीक्षा विभागास संपूर्ण वर्षभर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.टी.एम.वराट, प्राध्यापकवृंद व प्राध्यापकेतर सेवकवृंद यांचे सहकार्य लाभले.

**– प्रा.पी. ए. फटांगरे**

महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी



# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।
जे खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।२।।
दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।४।।
चलां कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणींचे गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडीत ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।८।।
येथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाहला ।।९।।

महाविद्यालयाचे प्राचार्य
डॉ.टी.एम.वराट
यांचे समवेत कला शाखा
व वाणिज्य शाखेतील
प्राध्यापकवृंद






महाविद्यालयाचे प्राचार्य
डॉ.टी.एम.वराट
यांचे समवेत शास्त्र शाखा व
संगणक शाखेतील
प्राध्यापकवृंद

महाविद्यालयाचे प्राचार्य
डॉ.टी.एम.वराट
यांचे समवेत
कार्यालयीन सेवकवृंद






## महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये

- आधुनिक भव्य व सुसज्ज इमारत
- अनुभवी व उच्चशिक्षित प्राध्यापकवृंद
- समृद्ध ग्रंथालय व अभ्यासिका
- अद्ययावत स्वतंत्र प्रयोगशाळा कक्ष
- इंटरनेट सुविधा व अद्ययावत संगणक कक्ष
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- प्रशस्त क्रीडांगण व वाहनतळ सुविधा
- राष्ट्रीय सेवा योजना
- विद्यार्थी समुपदेशन केंद्र
- महिला तक्रार निवारण समिती
- उत्कृष्ट निकालाची परंपरा
- बहिशाल शिक्षण केंद्र
- विद्यार्थी विकास मंडळ
- गुणवत्ता सुधार योजना
- विद्यार्थी विमा योजना
- विविध सांस्कृतिक उपक्रम
- विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट सुविधा
- शैक्षणिक सहलींचे आयोजन
- डॉ.क.भा.पाटील कमवा व शिका योजना
- विविध विषयाच्या चर्चासत्रांचे आयोजन
- वनस्पतीशास्त्र गार्डन
- अनुकूल व आनंददायी शैक्षणिक वातावरण

जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव-ने संचलित

**मारुतरावजी घुले पाटील कला वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय, अहमदनगर**

श्री राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव रोड, अहमदनगर - ४१४ १११.

Online College Code No. C02430 ID No. PU/AN/ACS/111/2009 College Code No. 893 Pun. Code-CAAA017120

फोन : ०२४१-२७७९४९७, Email : mgpcollege@gmail.com/website : www.mgpcollege.com